# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १८ डिसेंबर, २०१५ / अग्रहायण २७, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(३)** | **उद्योग मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५)** | **सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८२**

---

### औरंगाबाद जिल्हयात रमाई आवास योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१) * ३३२०३ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील रमाई आवास योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी महापालिकेला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असल्याने तांत्रिक अडचणीमुळे सदरील योजना अपूर्णावस्थेत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील योजनेचा लाभार्थ्यांना जास्तीत जास्त लाभ घेता यावा म्हणून एपीएल आणि बीपीएल धारक नागरीकांचे पुन्हा नव्याने सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरवर्षी शासनाकडून येणारा निधी परत जात असल्याने सदरील निधीतून सार्वजनिक शौचालये बांधण्याचा विचार शासन करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) उपरोक्त प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.
(२) रमाई आवास घरकुल योजने अंतर्गत उर्वरित लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी सर्वेक्षणाची कार्यवाही महानगर पालिकेकडून करण्यात येत आहे.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विक्रमगड तालुक्यातील (जि.पालघर) येथील देहर्जे नदीवरील पुलाची झालेली दूरावस्था

**(२) * ३५५१७ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रमगड तालुक्यातील कुंर्झे गावाजवळ देहर्जे नदीवर असलेल्या जुन्या पुलाची उंची कमी असल्याने दरवर्षी पावसाळ्यात पुलावरून पाणी वाहून जात असल्यामुळे तसेच गेल्या कित्येक वर्षांपासून पुलाच्या समोरील बाजूचे डांबरही वाहून गेल्याने पुलावरून प्रवास करणे नागरीकांच्या दृष्टीने धोकादायक ठरले आहे, हे खरे आहे काय,
(२) सदरहू पूल खूप जुना असून कमी उंचीचा असल्याने पावसाळ्यात किमान २० ते २५ वेळा पुलावरून पाणी वाहून जात असल्यामुळे या परिसरातील आदिवासी विद्यार्थी, नोकरदार व नागरीकांचे खूप हाल होत आहेत तसेच वाडा तालुक्याच्या बाजूने दरवर्षी पुलावरून पाणी वाहून जात असल्याने मोठा खड्डा पडल्यामुळे मोठा अनर्थ घडण्याची शक्यता आहे व याबाबत संबंधित बांधकाम विभागास वेळोवेळी स्थानिक नागरीकांनी प्रत्यक्ष भेटून व निवदेन देऊनही अद्याप या पुलाच्या दुरूस्तीस सुरूवात झालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे व पुलाच्या दुरूस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) ते (४) प्रश्नांकित विषयाबाबत कोणतेही निवेदन जिल्हा परिषद पालघर बांधकाम विभागास प्राप्त झालेले नाही.

प्रश्नांकित पुल हा विक्रमगड तालुक्यातील कंचाड ब्रम्हणगाव-कुर्झे-चिंचघर या इतर जिल्हा मार्ग क्र.९६ रस्त्यावर साखळी क्र. ५/५०० वर आहे. सदरहू पुल सबमर्शिबल प्रकारचा असून कमी उंचीचा असल्यामुळे डांबरी पृष्ठभाग खराब झालेला आहे. सदर नदीचे पात्र हे ८० मीटर लांबीचे असून त्यावर १०५ मीटर लांबीचा मोठा पूल बांधणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेमार्फत फक्त ३० मीटरच्या लहान पुलांची कामे केली जातात.

सदर पुलाची उंची वाढवून नव्याने काम आवश्यक असल्याने तसा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांच्याकडे पाठविण्यात आला आहे.

पुलाच्या पोच मार्गाची दुरुस्ती जिल्हा परिषदेकडील कार्यरत असलेले मैल कामगार यांच्या मार्फत वेळोवेळी केली जाते.

सदरच्या पुलाची व रस्त्यावरील डांबरी पृष्ठभागाच्या दुरुस्तीचे काम हे विशेष दुरुस्ती कार्यक्रम सन २०१५-१६ अंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

-----------------

## भिंगार (जि.अहमदनगर) शहरातून जाणा-या कल्याण विशाखापट्टणम या राष्ट्रीय महामार्ग दुरुस्तीचे कामाबाबत

**(३) * ३३३९६ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिंगार (जि.अहमदनगर) शहरातून जाणा-या कल्याण विशाखापट्टणम या राष्ट्रीय महामार्ग दुरुस्तीचे काम़ राष्ट्रीय महामार्ग २२२ व औद्योगिक विकास मंडळाच्या वादात अडकल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याप्रकरणी मध्यस्थी करून महामार्ग दुरूस्तीचे काम करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) कल्याण-अहमदनगर-नांदेड-निर्मल रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ वरील भिंगार (जि.अहमदनगर) गावातील कि.मी. २२०/७५० ते कि.मी. २२०/९५० या लांबीत रस्त्याच्या खालून टाकलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या जलवाहिनीतील गळतीमुळे रस्ता खराब झालेला आहे. जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ करीत आहे. तसेच सदर लांबीत रस्ता दुरुस्तीचे काम करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विभाग, नाशिक या कार्यालयाकडून निविदा मागविण्यात आल्या असून निविदा प्रक्रिया पुर्ण होताच रस्ता दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येईल.

-----------------

## मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेत झालेला गैरव्यवहार

**(४) * ३६४५२ श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेत झालेल्या गैरव्यवहारासंदर्भात उपनिबंधकांनी शासनास अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अहवालात काय आढळून आले,
(३) असल्यास, या अहवालानुसार संबंधित दोषी संचालक व अध्यक्षांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच मुंबई बँकअंतर्गत मजूर सहकारी संस्थाच्या माध्यमातून झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई (३), पश्चिम उपनगरे यांनी दि. ०३.१२.२०१३ रोजी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांना मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेत झालेल्या गैरव्यवहारासंदर्भाचा कलम ८९ अ अन्वये तपासणी अहवाल सादर केला आहे.

(२) सदर अहवालामध्ये वेगवेगळ्या बाबींमध्ये अनियमितता झाल्याचे नमुद करण्यात आले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने भाडेतत्वावरील जागा घेणे व जागा खरेदी रु.१.२३ कोटी, पतसंस्था कर्ज वाटपातील अनियमितता व त्यांचे थकित येणे खर्च रु.११२.९४ कोटी, इतर संस्था कर्ज प्रकरणातील अनियमितता येणे कर्ज १०.५७ कोटी, संगणक व संगणक प्रणाली खरेदीमधील अनियमितता रु. १४.५३ कोटी, मध्यप्रदेश औद्योगिक महामंडळ व्याज माफी रु. १३७.२७ कोटी व नोट सॉर्टिंग व सी.सी. टीव्ही खरेदी रु. १.५२ कोटी असे एकूण रु.२७८.०६ कोटीची अनियमितता समोर आणली आहे. तसेच मजुर सहकारी संस्थांना सभासदत्व देतांना ठरावामध्ये विसंगती व कर्ज वाटपामध्ये अनियमितता असल्याचे नमूद केले आहे.

(३) क्र.२ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अनियमिततेबाबत केलेल्या चाचणी लेखापरिक्षणाचा अहवाल दि. ०६/०७/२०१५ रोजी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांना प्राप्त झाला असून सदर अहवालात नमुद केलेल्या शेऱ्यांबाबत आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(४) होय.

बँकेने ७१ मजुर सहकारी संस्थांना सभासदत्व मंजूर करतांना ६१ मजूर सहकारी संस्थांचे सभासदत्व एकाच दिवशी झाले. मजुर सहकारी संस्थांच्या कर्ज वाटपामध्ये अनियमितता झाली असून त्याअनुषंगाने चाचणी लेखापरीक्षण अहवालात नमुद केलेल्या शेऱ्यांबाबत आवश्यक ती कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ताम्हाने (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे प्रस्तावित औद्योगिक वसाहतीस होणाऱ्या विरोधाबाबत

**(५) * ३८६७५ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण व गुहागर तालुक्यातील १४ गावांमध्ये मार्ग ताम्हाने औद्योगिक क्षेत्राकरिता भूसंपादन प्रक्रिया सुरू असून याबाबत ६ अ ची नोटीस काढून शेतकऱ्यांच्या सात-बारा उताऱ्यावर भूसंपादनाचा पेन्सिल शेरा लिहिण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांशी शेतकऱ्यांची बागायती जमिनी, शेत जमिनी व विकसीत होणाऱ्या जमिनी भूसंपादनामध्ये आल्याने या परिसरातील सर्व जमीन मालकांचा या प्रकल्पाला विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सदर १४ गावांतील ग्रामसभेने ठराव व निवेदन देऊन विरोध दर्शविला असून स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१५ रोजी मा.उद्योग मंत्री यांना निवेदन देऊन सदर प्रकरणी स्थानिकांचा विरोध लक्षात घेऊन त्यांना न्याय मिळणे करीता उचित निर्णय होणेबाबत विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, तद्अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) हे खरे आहे.

सदर औद्योगिक क्षेत्रासाठी भूसंपादनाची कार्यवाही उपविभागीय अधिकारी चिपळूण यांच्याकडे शासनाने सुपुर्द केली आहे. संबंधित खातेदार व ग्रामस्थ यांनी सदर भूसंपादनास विरोध केला आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी सदर औद्योगिक क्षेत्र रद्द करण्याची विनंती केली होती. यासंदर्भात शासन स्तरावर बैठका घेण्यात आल्या आहेत. त्यामध्ये नियोजित औद्योगिक वसाहतीमध्ये कोणत्याही परिस्थितीत प्रदुषणकारी कारखाने येणार नाहीत, भूसंपादन करतेवेळी बागायती तसेच गावठानच्या जागा बाधित होणार नाहीत व सक्तीचे भूसंपादन करण्यात येणार नाही, अशा प्रकारे भूसंपादनाचे नियोजन करावे, असे निर्णय घेण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य रस्ते विकास महामंडळाच्या ४५ हजार १४५ कोटी रुपये खर्चाच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत

**(६) * ३२४५५ श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य रस्ते विकास महामंडळाची (एमएसआरडीसी) आर्थिक पत घसरल्यामुळे या मंडळास काही महिन्यांपूर्वी पुरेसा निधी उपलब्ध न करता आल्याने

जलवाहतूक प्रकल्प गमवावा लागला होता तसेच एमएसआरडीसीने सादर केलेल्या प्रस्तावांना विद्यमान मा.मुख्यमंत्र्यांनी त्वरीत मान्यता देण्याचे आश्वासन यापूर्वीच दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्र्यांनी एमएसआरडीसीला आर्थिक स्थैर्य मिळण्यासाठी अनेक प्रकल्प देण्याची घोषणा करून एमएसआरडीसीला केलेल्या सुचनांनुसार एमएसआरडीसीने (अ) ३० हजार कोटी रूपये खर्चाचा मुंबई-नागपूर सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे (ब) ५ हजार १५० कोटींचा मुंबई पुणे द्रुतगती मार्गाच्या क्षमतेत वाढ करणारा प्रकल्प (क) ३ हजार कोटींचा ठाणे-बोरीवली बोगदा (ड) ७८५ कोटींचा ठाणे-घोडबंदर रस्त्यावरील उन्नत मार्ग (इ) २ हजार ६०० कोटी रूपये खर्चाचे पालघर येथील प्रशासकीय संकुल, जिल्हा मुख्यालय व संबंधित विकास प्रकल्प (फ़) ७६० कोटींचा सायन-पनवेल रस्त्यावरील खाडीपूल असे तब्बल ४५ हजार १४५ कोटी रूपये खर्चाच्या प्रकल्पाचे प्रस्ताव महामंडळाने सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्पांपैकी आजमितीस एकही प्रस्तावास शासनाने मंजुरी दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एमएसआरडीसीने सादर केलेल्या सदरहू प्रकल्पांना शासनाची मंजुरी मिळण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) सदरहू प्रकल्पाची कामे लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) होय, तथापी यातील मुंबई-पुणे द्रुतगतीमार्गाच्या क्षमतेत वाढ करण्याचा प्रकल्प व ठाणे घोडबंदर रस्त्यावरील उन्नत मार्ग बांधण्याचा प्रकल्प वगळता अन्य प्रकल्पांसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून घोषित करण्याबाबतचे प्रस्ताव महामंडळाने शासनास सादर केले आहेत.

(३), (४) व (५) सदरहू प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत मंजूर करण्यात आले आहे.

-----------------

**खेरडा (ता.किनवट, जि.नांदेड) येथील आश्रमशाळेतील विद्यार्थीनीचा उपचारादरम्यान झालेला मृत्यू**

**(७) * ३४६०१ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेरडा (ता.किनवट, जि.नांदेड) येथील आश्रमशाळेत चक्कर येऊन बेशुध्द झालेल्या विद्यार्थीनीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले आहे,

(३) त्यानुसार शासनाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आलेली आहे. सदर विद्यार्थीनी दिनांक ३०.९.२०१५ रोजी आजारी पडल्यामुळे तिच्यावर ग्रामीण रुग्णालय गोकुंदा किनवट येथे उपचार करण्यात येत होते. परंतु उपचारादरम्यान तिचे निधन झाले आहे. तथापि व्हिसेरा अहवाल व अंतिम चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

-----------------

**औरंगाबाद जिल्हयात रस्ते दुरुस्तीच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(८) * ३४६२७ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत औरंगाबाद जिल्हयात सन २०११ ते २०१४ या कालावधीत करण्यात आलेल्या रस्ते दुरुस्तीच्या कामात, अनेक कामे प्रत्यक्षात न करता कागदोपत्री पूर्ण झाल्याचे दाखवून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करुन कोट्यवधी रुपयांच्या शासकीय निधीचा अपहार करण्यात आल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्यानंतर शासनाने उच्चस्तरीय चौकशी सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ते दुरुस्तीच्या कामासाठी शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीपैकी सुमारे ८० कोटीं रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे पहिल्या टप्प्यातील प्राथमिक चौकशीत निदर्शनास आले असून २७ अभियंत्यांना दोषी ठरविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू चौकशीत दोषी ठरविण्यात आलेल्या २७ अधिकाऱ्यांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सन २०११-१२, २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षात गट-अ अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम), औरंगाबाद यांच्याकडुन करण्यात आलेल्या कामांची चौकशी अधीक्षक अभियंता, दक्षता पथक मंडळ, मुंबई यांचेकडून करण्यात आली आहे.
(२) व (३) अधीक्षक अभियंता, दक्षता पथक मंडळ, मुंबई यांनी शासनास सादर केलेल्या अहवालात नमूद अनियमिततेच्या अनुषंगाने संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या येहळेगांव सोळंके (ता.औढा नागनाथ) येथील शाखेत सुमारे ३१ लक्ष ८७ हजार रुपयांचा करण्यात आलेला अपहार**

**(९) * ३८७२४ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या येहळेगांव सोळंके (ता.औढा नागनाथ) येथील शाखेत सन २००३ ते २०१३ या कालावधीत खातेदारांचे बोगस चलन तयार करुन बनावट हस्ताक्षराच्या आधारे सुमारे ३१ लक्ष ८७ हजार रुपयांचा अपहार झाल्याचा प्रकार माहे ऑक्टोबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

माहे एप्रिल, २०१५ मध्ये अपहार उघडकीस आलेला आहे.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी करण्याचे आदेश दि. २४.११.२०१५ रोजी देण्यात आले आहेत अद्याप चौकशी सुरु आहे.

(३) चौकशीचे काम चालु असुन बँकेने सेवेतील संबंधीत कर्मचा-यांना सेवेतुन निलंबित करुन पोलिस स्टेशन, औंढा नागनाथ येथे एफ. आय. आर. क्र.७९/१५ अन्वये दि. २७.१०.२०१५ रोजी भारतीय दंडविधान ४२०, ४६८, ४७१, ३४ नुसार गुन्हा नोंद केलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मातंग समाजाच्या विविध समस्यांचे निराकरण करण्याबाबत

**(१०) * ३८४६९ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मातंग समाजाच्या विविध अडचणी, समस्यांचे निराकरण व्हावे, याकरीता विविध मागण्याचे निवेदन शासन दरबारी मातंग समाजाच्या वतीने माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील मातंग समाजावरील अडचणी व अत्याचार थांबविण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) सदरचे निवेदन अद्याप प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, मातंग समाजाचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास होण्याचे दृष्टीने शासनाने क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोग स्थापन करण्यात आला होता. या विभागाच्या दि.३१/१२/२०११ च्या शासन निर्णयान्वये क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने शासनास सादर केलेल्या एकूण ८२ शिफारशीपैकी ६८ शिफारशी तत्वत: मान्य करण्यात आल्या असून त्याबाबत विविध विभागांकडून अंमलबजावणी करण्यात येत आहे. आरक्षणविषयक शिफारशीसह उर्वरीत १४ शिफारशी अमान्य करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## अहमदनगर शहरातील प्रस्तावित उड्डाणपुलाबाबत

**(११) * ३८६६९ श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर शहरातील वाढत्या वाहतुकीवर मात करण्यासाठी व नागरीकांना सुलभ वाहतुक करण्यात यावी यासाठी पाटील हॉस्पिटल ते सक्करचौक पर्यंत उड्डाणपुल बांधण्याचा निर्णय शासनाने सन २००३ व २००४ या वर्षात घेऊनही अदयाप सदर पुलाच्या कामास सुरुवात करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच, सदर उड्डाणपुल बांधणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय. अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) खाजगीकरणाअंतर्गत शिरुर ते अहमदनगर या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामामध्ये विषयाधीन उड्डाणपुलाच्या बांधकामास दिनांक २४.४.२००६ रोजी मंजूरी मिळालेली आहे. सदर उड्डाणपुलासाठी आवश्यक असणाऱ्या क्षेत्राचे भूसंपादन सप्टेंबर, २०१२ मध्ये पूर्ण करुन जागा उद्योजकास हस्तांतरित करण्यात आली. तथापि उड्डाणपुलाच्या किंमतीबाबत लवाद मंडळाकडे दावा प्रलंबीत आहे. लवादाच्या निर्णयानंतरच याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## परभणी जिल्हयातील आदिवासी आणि मागासवर्गीय घटकातील विविध उपाययोजनांसाठीचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(१२) * ३८३८४ श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील आदिवासी आणि मागासवर्गीय घटकांकरिता विविध उपाययोजनांसाठी जिल्हा नियोजन समितीने मार्च २०१५-२०१६ या वर्षासाठी निधी वितरीत केला आहे, काय व असल्यास किती,

(२) असल्यास, अर्धवार्षिक अहवालानुसार आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनांवर अद्याप एक रूपयाही खर्च करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास सदरहु निधी कधी खर्च करणार या बाबत शासनाचे धोरण काय आहे,
(४) असल्यास, वंचित घटकांना त्या निधीचा फायदा मिळण्याकरीता विलंब लावणा-या दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

जिल्हा नियोजन समितीने सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता अर्थसंकल्पित २३१.०७ लक्ष निधीपैकी रु. १८१.०७ लक्ष निधी बीडीएस वर वितरीत केलेला आहे.
(२) हे खरे नाही.

परभणी जिल्हा नियोजन समितीचा अर्थसंकल्पित संपुर्ण निधी आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनांवरच खर्च केला जातो.
(३) जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरुन सर्व संबंधितांना १००% निधी खर्च करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याच्या अर्थसंकल्पात अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक तरतूद करण्याबाबत

**(१३) * ३४९११ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या कल्याणासाठी जाती उपयोजना राज्यात राबविण्यात येत असून राज्याच्या अर्थसंकल्पात अनुसूचित जमाती लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक तरतूद करण्याचे शासनाचे धोरण असून त्यानुसार अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या गत तीन वर्षात अनुसूचित जाती उप योजनेसाठी अर्थसंकल्पात करण्यात आलेली तरतूद पुर्णपणे वापरण्यात आलेली नसून त्यापैकी काही निधी अन्यत्र वळविण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत तीन वर्षात वर्षनिहाय अर्थसंकल्पात किती आर्थिक तरतूद करण्यात आली होती, त्यापैकी प्रत्यक्षात या योजनेवर किती निधी खर्च करण्यात आला, उर्वरित निधी या योजनेवर खर्च न करण्याची कारणे काय आहेत व निधी अन्यत्र वळविण्यात आला असल्यास त्याची कारणे व तपशील काय आहे,

(४) अशा प्रकारे योजनेचा निधी अन्यत्र वळविण्यात येऊ नये यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे अथवा येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) नाही.

(३) गत तीन वर्षात सन २०१२-१३ मध्ये रु. ४५९०.०० कोटी, सन २०१३-१४ मध्ये रु. ४९९७.६८ कोटी व सन २०१४-१५ मध्ये रु. ६०४४.२६ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला होता त्यापैकी अनुक्रमे सन २०१२-१३ मध्ये रु. ३२३६.१७ कोटी सन २०१३-१४ मध्ये ३५८२.६० कोटी व सन २०१४-१५ मध्ये रु. ३५८३.२९ कोटी इतका निधी खर्च झालेला आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार अन्यत्र निधी वळविण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील चांदणी चौकात व्यावसायिक स्वरुपाची झालेली अतिक्रमणे

**(१४) * ३३२४९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील अतिजलद आणि मोठ्या वाहतुकीच्या रस्त्यात व सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या एन.डी.ए. लगतच्या मुख्य चांदणी चौकात मोठ्या प्रमाणात व्यावसायिक स्वरुपाची अतिक्रमणे, अनधिकृत खाजगी

बस तिकीट विक्री शेड व इतर स्वरुपाची अतिक्रमणे झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या परिसरात अनधिकृत व्यवसायांमुळे मोठया प्रमाणात धोका निर्माण होऊनही प्रशासनाचे अधिकारी त्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली व अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ हा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या आखत्यारित आहे. सदर रस्त्यावर पूणे शहरातील चांदणी चौकामध्ये अनधिकृत खाजगी बससेवा तिकिट विक्री शेड्स उभारण्यात आलेली आहेत. सदर अतिक्रमणे काढण्यासाठी आवश्यक ती मदत मिळण्याबाबत जिल्हा प्रशासनाला विनंती करण्यात आली असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य सहकारी बँकेकडे तारण असलेल्या प्रियदर्शनी शेतकरी सहकारी साखर कारखान्याने साखरेची परस्पर विक्री केल्याबाबत

**(१५) * ३५५८१ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रियदर्शनी शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. अरविंद नगर, तोडार, ता.उदगीर, जि. लातूर यांनी राज्य सह. बँकेकडे तारण स्वरुपात असलेली, साखर कारखान्याची साखर परस्पर विक्री केल्याबाबत दिनांक २७ नोव्हेंबर, २०१४ रोजी लेखी तक्रार केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१ सह.संस्था, (साखर) लातूर यांनी या प्रकरणी चौकशी करुन महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम-८६ अन्वये चौकशी करण्याची मा.साखर आयुक्त यांना शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी दिनांक ५ ऑगस्ट, २०१५ व ३० सप्टेंबर, २०१५ नुसार लेखी तक्रार दिली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशी नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे सदर तक्रारीच्या अनुषंगाने विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था (साखर) लातूर यांनी दि. २२/०७/२०१५ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ८३ अन्वये चौकशी करणेकरिता प्राथमिक चौकशी अहवाल प्रादेशिक सह संचालक (साखर) नांदेड यांना सादर केला आहे.

(३) होय.

(४) प्रादेशिक सहसंचालक (साखर) नांदेड यांचे आदेश दि. ३१/१०/२०१५ नुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशीचे आदेश निर्गमित केले असून प्राधिकृत अधिकारी म्हणून विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था (साखर) लातूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(५) प्राधिकृत चौकशी अधिकारी यांचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

### कोळघर (ता.अलिबाग, जि. रायगड) येथील राष्ट्रीय माध्यमिक आश्रमशाळेतील विविध समस्यांबाबत

**(१६) * ३१७४१ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील कोळघर येथील राष्ट्रीय माध्यमिक आश्रमशाळेसाठी असलेली अधिक्षक, शिक्षक व लिपीक यांची पदे अनेक वर्षांपासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची कारणे काय आहेत तसेच सदर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वसतीगृह नसल्याने ते शाळेच्या वर्गातच राहतात, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आश्रमशाळेसाठी आवश्यक असलेली उक्त पदे भरण्याबाबत तसेच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांकरिता वसतीगृह बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबत शासनस्तरावरील कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे, अंशत: खरे आहे.

शासकिय माध्यमिक, आश्रमशाळा, कोळघर येथे एकूण २८ पदे मंजूर आहेत त्यापैकी ८ पदे रिक्त आहेत. रिक्त ८ पदांपैकी ५ शिक्षक संवर्गाची व ३ शिक्षकेतर संवर्गातील आहेत.
(२) जुलै २०१४ मध्ये अपर आयुक्त, ठाणे यांनी काढलेल्या शिक्षक भरतीच्या जाहीरातीस मा. न्यायालयाने स्थगिती दिल्याने पद भरती झालेली नाही. आश्रमशाळेच्या वसतीगृहाचे बांधकाम सुरु असल्याने विद्यार्थी सध्या वर्ग खोल्यांमध्ये राहत आहेत.
(३) रिक्त पदे भरण्याबाबत अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे यांच्याकडून कार्यवाही सुरु आहे. बांधकाम आराखड्यातील बदल व क्षेत्रफळात वाढ झाल्यामुळे खर्चात वाढ होत आहे. त्यामुळे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता इगतपुरी (जि.नाशिक) येथे क्रीडा प्रबोधिनी व नंदुरबार येथील मध्यवर्ती क्रीडा केंद्राचे काम सुरु करणेबाबत**

**(१७) * २८६८६ श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता इगतपुरी (जि.नाशिक) येथे दिनांक २४ ऑगस्ट, २००९ रोजी क्रीडा प्रबोधिनी व नंदुरबार येथे मध्यवर्ती क्रीडा केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेवूनही माहे ऑक्टोबर, २०१५ पर्यंत सदर प्रबोधिनीचे काम सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रबोधिनीचा बांधकाम आराखडा व अंदाजपत्रकांना राज्य क्रीडा समितीने मान्यता देवूनही शासनाच्या दिरंगाईमुळे सदर काम अद्याप सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, अनुसूचित जमातीच्या मुलांच्या क्रीडा गुणांना चालना देणे व क्रीडा विषयक सोईसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उक्त क्रीडा प्रबोधिनीचे कामे सुरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) उच्चस्तर सचिव समितीच्या दि. ०७.०२.२०१५ रोजीच्या बैठकीत सदर बांधकामाचा एकूण रु. ५९.९४ कोटी इतक्या रकमेपैकी प्रथम टप्प्याकरिता रु. २५.०० कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे.

(३) सदर क्रीडा प्रबोधिनी तात्पुरत्या स्वरुपात क्रीडा विभागाच्या नाशिक येथील क्रीडा संकुलात सुरु करण्यात आलेली आहे.

सदर क्रीडा प्रबोधिनीत शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच एकलव्य शाळांमधील Sport Specific Test मध्ये पात्र ठरलेल्या ८३ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. सदर विद्यार्थ्यांना दररोज तज्ञ क्रीडा प्रशिक्षकांमार्फत खो-खो, कबड्डी, धावणे, गोळाफेक, थाळीफेक इत्यादी खेळांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केंद्र शासनाने सवलतीच्या कर्जास अपात्र ठरवलेल्या २२ कारखान्यांना कर्ज देण्याच्या शासन निर्णयाबाबत

**(१८) * ३४४७३ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र शासनाने जाहिर केलेल्या सवलतीच्या कर्जाला अपात्र ठरवलेल्या २२ कारखान्यांना १८७ कोटीचे कर्ज देण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या योजनेकरिता अपात्र असलेल्या राज्यातील २२ साखर कारखान्यांना केंद्र शासनाच्या योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाने शासन निर्णय दि. ०५/०९/२०१५ अन्वये सॉफ्ट लोन योजना जाहीर केलेली आहे.

(२) सदर योजनेतंर्गत राज्यातील ७ साखर कारखांन्याना रु. ७२.३८ कोटी इतके कर्ज मंजूर झाले आहे असून त्यापैकी रु. ६७.३८ कोटी रकमेचे वितरण झाले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथे अपंगांनी प्रलंबित मागण्याकरिता सीपीआर रुग्णालयावर काढलेला मोर्चा

**(१९) * २९०७० श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील अपंगांच्या विविध मागण्या प्रलंबित ठेवल्याच्या निषेधार्थ सीपीआर रुग्णालय व जिल्हा परिषदेवर मोर्चा काढण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) तसेच अपंगावर योग्य उपचार होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

अधिष्ठाता, सीपीआर रुग्णालय, कोल्हापूर यांचेकडून प्राप्त माहितीनुसार, सीपीआर रुग्णालयात अपंगांवर योग्य ते उपचार केले जात आहेत. तसेच जिल्हा

परिषद, कोल्हापूर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार उपरोक्त मोर्चातील निवेदनाच्या आधारे जिल्हा परिषद कार्यालयाकडून उचित कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे अपंगाकरीता राखीव ठेवण्यात येणारा ३ टक्के निधी विविध योजनांवर खर्च करण्यात येत असून, जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींना ३ टक्के निधी खर्च करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी निर्देश दिलेले आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण-मुरबाड राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ चौपदरीकरण करण्याबाबत**

**(२०) * ३५६३७ श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-मुरबाड राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ चे चौपदरीकरण करण्याचे काम शासनस्तरावर निश्चित झाले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावर मोठा प्रमाणावर वाहनाची वर्दळ असल्याने तसेच शहाड ते कांबा रोड अरुंद असल्यामुळे अपघातांची संख्या तसेच वाहतुक कोंडी मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वाहतूक कोंडी व अपघातामुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण झालेला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या वतीने सदर चौपादारीकरण करण्यासाठी कोणती उपाययोजना तसेच कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) कल्याण ते मुरबाड (कि.मी. १०/०० ते कि.मी. ३८/००) ही लांबी राष्ट्रीय महामार्ग क्र. २२२ चा भाग असून अस्तित्वातील रस्त्याची लांबी ही दुपदरी असल्याने सदर भागामध्ये जास्त वर्दळीच्या वेळी वाहतुक कोंडी होते. या महामार्गाच्या लांबीतील ठाणे ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महामार्गावर झालेल्या अपघातांमुळे परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता असे पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी कळविले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करुन कल्याण ते मुरबाड (कि.मी. १०/०० ते कि.मी. ३८/००) लांबीचे चौपदरीकरण व मजबुतीकरण प्रस्तावित आहे. या प्रस्तावाचा अंतिम सुसाध्यता अहवाल सल्लागाराकडून दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ ला मुख्य अभियंता, (राष्ट्रीय महामार्ग) सार्वजनिक बांधकाम विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे प्राप्त झाला असून छाननी नंतर केंद्रशासनाकडे मंजूरीस्तव पाठविण्यात येईल. सदर सुसाध्यता अहवालास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येईल,
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गाच्या कशेडी ते झाराप या तिसऱ्या टप्प्यातील ठिकाणांचे फेरसर्वेक्षण करण्याबाबत

**(२१) * ३७०५८ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाच्या कशेडी ते झाराप या तिसऱ्या टप्प्यातील २८९ कि.मी.च्या चौपदीकरणामधील १०० हून अधिक वादग्रस्त ठिकाणांचे फेरसर्वेक्षण करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑक्टोबर, २०१५ च्या मध्ये वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फेरसर्वेक्षणाकरिता खर्च येणार असून हे काम पूर्ण झाले आहे काय,

(३) असल्यास, या फेरसर्वेक्षणाचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(४) असल्यास, फेरसर्वेक्षणामध्ये कोणत्या बाबींचा विशेष विचार करण्यात आला आहे,

(५) असल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) (३), (४) व (५) मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र ६६ च्या कशेडी ते झाराप (कि.मी.१६१/०० ते ४५०/१७०) या लांबीच्या चौपदरीकरणाच्या कामास केंद्र शासनाकडून तत्वत: मान्यता प्राप्त झालेली असून, भूसंपादनाचे संयुक्त मोजणीचे काम प्रगतीपथावर आहे.

भूसंपादन प्रक्रिया सुरु असताना विविध ठिकाणांहून प्रस्तावित बायपास, वाहन भूयारी मार्ग, पादचारी भूयारी मार्ग, रस्त्याच्या आखणीमध्ये बदल, धार्मिक स्थळे वाचविणे, संपादित रस्त्याच्या रुंदीमध्ये बदल इ. स्वरुपाच्या मागण्या केल्या गेल्या. त्या अनुषंगाने दिनांक ३ जुन, २०१५ रोजी मुंबई येथील बैठकीमध्ये मा. केंद्रीय मंत्री भूपृष्ठ वाहतूक यांनी प्राप्त निवेदनांचा अभ्यास करुन अहवाल, देण्यात यावा असे आदेशित केले. त्यानुसार सल्लागार मे. व्हायंट्स सोल्यूशन्स, हरयाणा यांना ३२ ठिकाणांचे फेरसर्वेक्षण करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

फेरसर्वेक्षणाकरीता रु. १८४.७५ लक्ष इतका खर्च अपेक्षित असून आवश्यक प्रस्ताव मंजूरीसाठी केंद्र शासनाकडे दिनांक १९ ऑक्टोबर, २०१५ रोजी सादर केलेला आहे. या प्रस्तावास केंद्र शासनाकडून मंजूरी प्राप्त झाल्यावर फेरसर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात येईल.

-----------------

## नाशिक, सातपूर परिसरातील एमआयडीसी कंपनीमधून रसायनयुक्त पाणी रस्त्यावर वाहत असल्याबाबत

**(२२) * ३८१३० श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक, सातपूर परिसरातील एमआयडीसीमधील एका चारचाकी शोरुम समोरील कंपनीमधून केमिकलयुक्त हिरव्या रंगाचे पाणी संपूर्ण रस्त्यावर वाहत आहे असे माहे ऑक्टोबर, २०१५ ला निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गंगापूर रोडवरील आसारामबापू पुलालगतचे ड्रेनेज तुंबल्याने नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे व हे दुर्गंधीयुक्त सांडपाणी थेट गोदावरीत मिसळत असल्याने प्रदूषणात भर पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न १ व २ येथील ड्रेनेजची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) हे खरे नाही.

सातपूर परिसरातील एमआयडीसी मधील कंपनी मधून रस्त्यांवर सद्यस्थितीत औद्योगिक सांडपाणी वाहत असल्याचे आढळून आले नाही. माहे ऑक्टोबर, २०१५ दरम्यान अशी कोणतीही तक्रार एमआयडीसीस प्राप्त झाली

नाही. सदर औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निर्माण करणाऱ्या ७२ उद्योगांनी सांडपाण्यावर प्रक्रीया करण्यासाठी अद्यावत व आवश्यक ती जलप्रदूषण नियंत्रण सयंत्रणा उभारली आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कोणत्याही कारखान्यास कारखान्याबाहेर प्रक्रियाकृत पाणी बाहेर सोडण्यास परवानगी देत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्ह्यातील ९०० सहकारी संस्था**
**केवळ कागदोपत्री असल्याबाबत**

**(२३) * ३७८१८ श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सहकारी संस्थाचे सर्वेक्षण करण्याचे काम दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ रोजी पूर्ण झाले असून पुणे जिल्ह्यातील ९०० सहकारी संस्था केवळ कागदोपत्री असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंद असलेल्या संस्था पुनर्जीवित करणे अथवा नोंदणी रद्द करण्याबाबत शासनाने कार्यवाही केली वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

पुणे जिल्ह्यामध्ये एकूण २५३८० संस्था आहेत. सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. सर्वेक्षणामध्ये बंद/कार्यस्थगित/ठावठिकाणा नसलेल्या कागदपत्री असलेल्या एकूण ५०८० संस्था आढळून आलेल्या आहेत.

(२) सर्वेक्षणामध्ये आढळलेल्या एकूण ५०८० बंद/कार्यस्थगित/ठावठिकाणा नसलेल्या कागदपत्री असलेल्या संस्थांपैकी ३५ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. १२६८ संस्थांना अवसायनाचे अंतरिम आदेश देण्यात आलेले आहेत व ५६१ संस्थांना अवसायनाचे अंतिम आदेश देण्यात आले आहेत. उर्वरित संस्थांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ अन्वये अवसायनाची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**नाशिक येथील आश्रमशाळांमधील कर्मचा-यांची ६०० पदे रिक्त असल्याबाबत**

**(२४) * ३१५७५ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक समाजकल्याण विभागातील आश्रमशाळांमध्ये कर्मचा-यांची ६०० पदे रिक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

राज्यातील प्राथमिक व माध्यमिक विजाभज आश्रमशाळांची मान्यता दद्द केल्यामुळे तसेच आश्रमशाळेतील विद्यार्थी पट संख्या कमी झाल्यामुळे राज्यामध्ये ९१५ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी अतिरिक्त ठरलेले आहेत. त्यामुळे विजाभज आश्रमशाळांमध्ये राज्यात अथवा नाशिक विभागात पदे रिक्त असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये संचालक मंडळाच्या निष्क्रियतेमुळे पिक कर्ज पुरवठ्यासाठी ५% भाग भांडवल जमा केल्याबाबत**

**(२५) * ३७९१५ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये संचालक मंडळाच्या निष्क्रियतेमुळे पिक कर्ज पुरवठ्यासाठी ५% भाग भांडवल जमा करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाबार्ड कडून करण्यात येणाऱ्या कर्ज पुरवठ्यामध्ये सक्तीने ५% कपात केल्यामुळे बँकेमध्ये अंदाजे १४६ कोटी रुपयांच्या ठेवी जमा झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सहकारी संस्थांच्या १४६ कोटीच्या ठेवी परत करणेबाबत शासन जिल्हा बँकेला आदेश करणेबाबत निर्णय घेईल काय,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

बँकेच्या पोट नियमानुसार कर्जदार सभासद संस्थांकडून मंजुर कर्ज रकमेच्या ५% प्रमाणात भागभांडवल घेतले जाते.

(२) नाही.

बँकेने पोटनियमानुसार वेळोवेळी कपात केलेल्या ५ % प्रमाणे भागभांडवलाची रक्कम रु. १४७.१२ कोटी आहे. तसेच कर्जदार सभासदांकडून कर्ज उचलीच्या ५% प्रमाणे कपात केलेल्या ठेवीची रक्कम रु.६.७५ कोटी इतकी जमा झालेली आहे.

(३) अंशत: खरे आहे.

कर्जदार सभासदांकडून कर्ज उचलीच्या ५ % प्रमाणे स्विकारलेली ठेव बँकेकडे रु.६.७५ कोटी इतकी रक्कम जमा आहे.

तथापी, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापुर कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७९(२) च्या दि.७/७/२०१५ रोजीच्या निर्देशान्वये कर्ज उचल देताना शेअर्स रक्कम व्यतीरिक्त ठेव कपात करुन घेता येणार नाहीत असे बँकेस निर्देश दिले आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने फेरकर्जासाठीची ठेव तारणाची अट शिथिल केली आहे. त्यामुळे सध्या बँकेने कर्जदार सभासदांकडून ठेव कपात करणे स्थगीत केले आहे. बँकेने यापुर्वी ५ % प्रमाणे कपात केलेली ठेव रक्कम ठेवीदाराने परत मागणी केल्यास परत करण्याबाबत बँकेस कळविण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(२६) * २९२७६ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.वैभव नाईक**

**(कुडाळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक २६ जून, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार विमुक्त जाती व भटक्या जमातींसाठींच्या माध्यमिक आश्रमशाळामधील मुलांना त्याच ठिकाणी उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी या हेतूने १४८ शाळांना मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयाला ६ शिक्षक १ स्वयंपाकी, १ प्रयोगशाळा सहाय्यक ही पदे मान्य करण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, २८ जून, २००८ रोजीच्या आदेशानुसार त्यांना २०१२-१३ पासून २५ टक्के वेतन, २०१३-१४ पासून ५० टक्के, २०१४-१५ मध्ये ७५ टक्के व २०१५-१६ मध्ये १०० टक्के वेतन देण्याचे निश्चित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सामाजिक न्याय विभागाने याबाबत अद्याप कुठलाही निर्णय घेतला नाही तसेच उच्च माध्यमिक आश्रमशाळातील १५०० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना राज्य शासनाने तब्बल ७ वर्ष वेतन दिलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(५) वि.जा.भ.ज. उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न ७ वर्षापासून प्रलंबित असून या प्रकरणी सकारात्मक निर्णय घेऊन संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न तातडीने सोडविण्यात यावा अशा आशयाचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी मा.सामाजिक न्याय मंत्री यांना जुलै, २०१५ मध्ये वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(६) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने तसेच प्रश्न भाग १ ते ४ बाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (४) होय, अंशत: खरे आहे.

सामाजिक न्याय विभागाने शासन निर्णय दिनांक २६.०६.२००८ अन्वये १२५ व शासन निर्णय दिनांक ३१.०८.२००९ अन्वये २३ अशा एकूण १४८ विजाभज उच्च माध्यमिक आश्रमशाळांना मान्यता दिली आहे. सदर शासन निर्णयान्वये उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ५ व्या वर्षी २५ टक्के, ६ व्या वर्षी ५० टक्के, ७ व्या वर्षी ७५ टक्के व ८ व्या वर्षी १०० टक्के

वेतन अनुदान देण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला होता. विजाभज प्रवर्गाच्या उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची देय पदे निश्चित करण्यात आली. तथापि, सदर पदांचा आकृतीबंध निश्चित करुन त्यास अंतिम मान्यता देण्यात आलेली नाही. सदर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदमान्यतेचा व वेतन अनुदानाचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीने उपस्थित करण्यात आला होता. उच्चस्तरीय समितीने उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या पुर्ततेसह याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश दिले होते, त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) होय.

(६) याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**पाचोरा-भडगाव (जि.जळगाव) येथील रस्त्यांच्या कामाकरिता निधीचे वितरण करणेबाबत**

**(२७) * ३७८९२ श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा-भडगाव (जि.जळगाव) विधानसभा मतदार संघातील रस्ते, पूल इत्यादी कामाकरिता सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात लेखाशीर्ष ३०५४ मध्ये मंजूर झालेल्या कामांना निधीचे वितरण अद्यापपर्यंत करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या कामांना तातडीने निधी उपलब्ध करणेबाबत मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक ४ मार्च, २०१५ रोजीच्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामांना तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) सदर निवेदनातील ३० कामांना त्यांच्या अंदाजित किंमतीच्या साधारण ६०% निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

-----------------

**अमरावती महानगरपालिकेत रमाई आवास योजनेत बोगस लाभार्थ्यांची निवड झाल्याबाबत**

**(२८) * ३७२०६ डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्या वतीने अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी राबविल्या जात असलेल्या रमाई आवास योजनेतील ओबीसी व खुल्या प्रवर्गातील व्यक्तींनाही घरकुल मंजूर करण्यात आल्याची बाब अमरावती महानगरपालिका प्रशासनाचे निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्त, महानगरपालिका, अमरावती यांच्याद्वारे या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले व दोषीवर काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) या प्रकरणी चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील आदिवासी भागातील कुपोषण, बालमृत्यू रोखण्यासाठी डॉ.अब्दुल कलाम अमृत योजना राबविण्याबाबत**

**(२९) * ३८७८७ श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी भागातील कुपोषण, बालमृत्यू आणि कमी वजनाच्या

बालकांचा जन्म या गंभीर समस्यावर मात करण्यासाठी माजी राष्ट्रपती दिवगंत ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या नावाने डॉ.अब्दुल कलाम अमृत योजनेतून चौरस आहार देण्यात येणार असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही योजना राज्यातील १६ जिल्ह्यातील ८५ एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्पांव्दारे राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुपोषण रोखण्यासाठी मातांना एकवेळा पोषण आहार देण्यासाठी सरकारने प्रतिदिन २२ रुपयांची तरतुद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाढत्या महागाईमुळे सध्या केलेली तरतुद तीनपट (तिप्पट) रुपये करणार काय,

(५) असल्यास, त्याचा शासनाने काही कृती आराखडा तयार केला आहे काय,

(६) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

आदिवासी विकास विभागाच्या दि. १८/११/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये भारतरत्न डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु करण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

राज्यातील १६ जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्राअंतर्गत ९९ एकात्मिक बालविकास प्रकल्पातील अंगणवाडी क्षेत्रात राबविण्यात येणार आहे.

(३) हे खरे नाही.

या योजनेअंतर्गत चौरस आहाराच्या खर्चापोटी प्रति लाभार्थी प्रति दिन रु. २५/- प्रमाणे तरतुद करण्यात आली आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी अपंगत्व प्रमाणपत्राची ऑनलाईन नोंदणी करण्याबाबत**

**(३०) * ३६१२९ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित झनक (रिसोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड**

**पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण, रोजगार किंवा अपंगांसाठी लागू असलेल्या विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी अनेकांनी बोगस अपंगत्व स्वीकारले आहे, या बोगस अपंगांवर अटकाव घालण्यासाठी यापूर्वीचे अपंगत्व प्रमाणपत्र रद्द करुन नव्याने ऑनलाईन नोंदणी करण्याचे आदेश अपंग आयुक्तालयाने दिले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपंग आयुक्तालयाच्या या आदेशानुसार संगणकीय तपासणीची पध्दत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) हे खरे नाही.

अपंग अधिनियम, १९९५ अन्वये किमान ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्वाचे सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्यांने दिलेले प्रमाणपत्र असल्यास संबंधित व्यक्तीस शिक्षण, रोजगार किंवा अपंगांसाठी लागू असलेल्या विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात येतो. राज्यात अपंगत्वाची बोगस प्रमाणपत्रे घेऊन अशा योजनांचा कोणी गैर फायदा घेऊ नये, तसेच अपंगत्वाचे प्रमाणपत्र अधिक विश्वासार्ह व बिनचूक होण्यासाठी SADM (Software Assistance of Disability in Maharashtra) या संगणकीय सॉफ्टवेअर प्रणालीचा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत दि. ६ ऑक्टोबर, २०१२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार, अपंगांना ऑनलाईन प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हा मध्यवर्ती बँकेने मानवत तालुक्यातील ५ अकृषी साधन संस्थांना बोगस कर्ज वाटप केल्याबाबत

**(३१) * ३८७०३ श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा मध्यवर्ती बँकेने मानवत तालुक्यातील ५ अकृषी साधन

संस्थांना प्रत्येक ७ लाख रुपये कर्जाचे वाटप दिनांक २९ जुन, २०१५ रोजी केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानवत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीची आचार संहिता सुरु असताना हे कर्ज वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या संस्था कर्जवाटपास पात्र नसतानाही नियमबाह्यरित्या कर्ज वाटप करण्यात आल्याची तक्रार सदर लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांचेकडे दिनांक ५ जुलै, २०१५ रोजी केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी बोगस कर्जवाटप करणारे पदाधिकारी तसेच कर्ज स्विकारणाऱ्या संस्था यांचेवर काय कारवाई करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

परभणी जिल्हा मध्यवर्ती बँकेने मानवत तालुक्यातील ५ अकृषी साधन संस्थांना दि.१५/६/२०१५ रोजी कर्ज मंजूर केले आहे त्यापैकी ३ संस्थांना प्रत्येकी रु.७ लाख व १ संस्थेस रु.४ लाख बँकेने कर्ज वाटप केले आहे. उर्वरित एका संस्थेस कर्जवाटप केलेले नाही.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

मानवत बाजार समितीच्या निवडणुकी दरम्यान परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने वरील चार संस्थाना कर्ज वाटप केलेले आहे, तथापि बाजार समितीची निवडणुक प्रक्रीया व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने संस्थाना केलेले कर्ज वाटप या दोन्ही बाबी भिन्न आहेत. बाजार समित्यांच्या निवडणुकीसाठी पणन संचालक, पुणे यांच्या कार्यालयामार्फत आचारसंहीता निश्चीत करण्यात आलेली नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, परभणी, यांचे कार्यालयामार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आलेली आहे. सदरील ४ अकृषी सहकारी संस्थांना बँकेमार्फत केलेल्या कर्ज वाटपामध्ये अनियमितता असल्याचे निदर्शनास आल्याने विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद कार्यालयाने दि.०१.१२.२०१५ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी करणेबाबत आदेश निर्गमित केले आहेत. अद्याप चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मनवेल (ता.यावल, जि.जळगांव) येथील उज्ज्वल शिक्षण संस्थेच्या आदिवासी आश्रमशाळेत शासकीय निधीचा झालेला गैरव्यवहार

**(३२) * ३०६५६ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनवेल (ता.यावल, जि.जळगांव) येथील उज्ज्वल शिक्षण संस्थेच्या आदिवासी आश्रमशाळेत शासकीय अनुदानातील ४६ लाखांच्या निधीचा अपहार झाल्याची बाब माहे, ऑगस्ट २०१५ मध्ये शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी तत्कालीन आदिवासी प्रकल्पाधिकारी श्री.दुधाळ यांच्यासह संस्थाध्यक्ष, मुख्याध्यापक व इतर आठ संचालकही सहभागी आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) होय, हे खरे आहे. मा. प्रथम वर्ग न्यायाधीश, यावल यांचे दिनांक २३/०७/२०१५ चे आदेशान्वये स्थानिक पोलिस स्टेशन यावल जि. जळगाव येथे गुन्हा नोंद झालेला असून पोलीस यंत्रणेमार्फत पुढील तपास सुरु आहे.

(३), (४) व (५) पोलीस स्टेशन यावल येथे तत्कालीन प्रकल्प अधिकारी श्री. शुक्राचार्य दुधाळ व संस्थेचे इतर आठ संचालक यांचेविरुध्द गुन्हा दाखल आहे. दोषी व्यक्ती विरुध्द पोलीस स्टेशन यावल मार्फत चौकशी करण्यात येत आहे. चौकशी अंती दोषी व्यक्तीविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल.

-----------------

## राज्यात पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रद्द करण्यात आल्याबाबत

**(३३) * २८४०२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यातील पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती भटक्या जमाती, ओबीसी, व्हीजे एनटी, एसबीसी प्रवर्गातील आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची, सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून शिष्यवृत्ती रद्द केल्याने विविध विद्यार्थी संघटनांच्या वतीने शासनाच्या निर्णयाविरोधात दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणेच्या प्रवेशद्वारावर निदर्शने करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा निर्णय हा संविधानातील सामाजिक न्यायाच्या तत्वाला छेद देणारा असून, या निर्णयामुळे उक्त प्रवर्गातील हजारो विद्यार्थ्यांना आपले शिक्षण अर्धवट सोडावे लागणार आहे, हे खरे आहे काय तसेच पात्र विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शिवाजी विद्यापीठासह (जि.कोल्हापूर) महाराष्ट्रातील अन्य विद्यापीठांत SICTE संलग्न नसलेल्या पण विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या राज्याची मान्यताप्राप्त असलेल्या सर्वच अभ्यासक्रमातील आरक्षित जागांवर प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती न देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) शासनाने राज्यातील पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांची सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून शिष्यवृत्ती रद्द केल्याच्या शासनाच्या निर्णयाविरोधात विविध विद्यार्थी संघटनांच्या वतीने दि. १२ ऑगस्ट,

२०१५ रोजी सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे च्याप्रवेशद्वारावर निदर्शने करण्यात आली, हे ख खरे आहे तथापि, असा निर्णय शासनाने घेतलेला नाही. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यासाठीच्या सद्या सुरु असलेलया मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेत इतर काही अभ्यासक्रमांचा समावेश नाही. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांना प्रवर्गातील त्या अभ्यासक्रमांसाठीच्या शिष्यवृत्तीचा लाभ दिला जात नाही. .

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात जिल्हानिहाय जात पडताळणी समित्यांवर अध्यक्षांच्या नेमणूका करण्याबाबत

**(३४) * ३८७०१ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जातपडताळणी करीता जिल्हानिहाय स्थापन झालेल्या समित्यांवर अध्यक्षांच्या नेमणुका अद्याप झाल्या नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती जिल्हा समित्यावर अध्यक्ष नेमणूक झाली नाही तसेच महसूल विभागाकडून या नेमणुका करण्यामध्ये दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(३) त्यामुळे जात वैधता प्रमाणपत्रे मिळण्यास विलंब होत असून या संबधी प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे व येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) शासन निर्णय सामाजिक न्याय विभाग दि. २.३.२०१५ अन्वये जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या स्थापन करण्यात आल्या असून या समित्यांसाठी पद निर्मिती प्रस्तावित आहे. तर समित्यांच्या अध्यक्ष पदांवर सध्या चार अधिकारी कार्यरत असून उर्वरित पदांसाठी अधिकारी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही महसूल व वनविभागाकडून करण्यात येत आहे.

(३) जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडील प्रकरणे विशेष मोहिमा राबवून तातडीने निकाली काढण्यात येत असून कागदपत्रांची पूर्तता न झालेली प्रकरणे निकाली निघण्यास काही कालावधी लागत असून, कागदपत्रांची पूर्तता झालेली प्रकरणे विना विलंब निकाली काढण्यात येत आहेत.

तसेच अर्जदारांना ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली असून, अर्जदारांच्या मार्गदर्शनासाठी हेल्पलाईन सुध्दा सुरु करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्हयात समाजकल्याण विभागाच्या**
**शिष्यवृत्ती वाटपात झालेला गैरव्यवहार**

**(३५) * ३५३४३ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात समाजकल्याण विभागाच्या वतीने गत दोन वर्षात मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती वाटपात गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर गैरव्यवहारास जबाबदार असणा-यांवर शासनाने आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) समाजकल्याण विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीच्या वाटपात सोलापूर जिल्हयात गत दोन वर्षात गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे.

(२) होय.

(३) राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती प्रतिपूर्तीची योजना सन २०१० पासून ऑनलाईन करण्यात आली असून त्यासाठी पुण्यातील मास्टेक कंपनीची नेमणूक करण्यात आली आहे. सदर कंपनीची तत्कालीन कर्मचारी (कु.सारिका दत्तात्रय काळे) हीने शिष्यवृत्तीच्या ऑनलाईन प्रणालीमधील विद्यार्थ्यांच्या

यादीमध्ये बिगर शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची नावे घालून संगणक प्रणालीचा गैरवापर करुन खोटे दस्ताऐवज तयार करुन सरकारी रकमेचा अपहार केला आहे.

सदर अपहारात जबाबदार असलेल्या व्यक्तींवर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यानुसार पोलीसांनी संबंधितांना अटक केली असून पुढील तपास पोलीसांकडून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) कर्नाळा किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेली कोरळवाडी आदिवासी वाडी विकास कामांपासून वंचित असल्याबाबत**

**(३६) * ३६६२३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) कर्नाळा किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेल्या कोरळवाडी हि आदिवासी वाडी अनेक विकास कामांपासून वंचित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १०४ लोकसंख्या असलेली आदिवासी वाडी वीज, पाणी व रस्ते या मुलभूत सुविधांपासून अद्यापही वंचित आहे, हे खरी आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून बांधलेल्या एकमेव माध्यमिक शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना नैसर्गिक विधींसाठी उघड्यावर बसावे लागते, हे ही खरी आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग क्र २ व ३ नुसार आदिवासी वाडीला मुलभूत सुविधा पुरवण्यासाठी व आदिवासी विद्यार्थ्यांना होणाऱ्या गैरसोई दूर करण्याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नोकरभरतीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३७) * ३०५९० श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कंत्राटी लिपीक व अनुकंपा तत्वावरील नोकरभरतीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नियमबाह्य भरती प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित बँकेच्या व्यवस्थापनेवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत चालविण्यात येणाऱ्या वसतीगृहात विद्यार्थ्यांना प्रवेश न मिळाल्याबाबत

**(३८) * ३६७५० डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २६ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहात २०१५-१६ या सत्राकरिता विद्यार्थ्यांकडून किती अर्ज प्राप्त झाले आहेत,

(२) असल्यास, अर्धे सत्र संपले तरी त्यातील जवळपास २ हजार ४४४ विद्यार्थ्यांना अद्यापी प्रवेश मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) सन २०१५-१६ या वर्षात वसतीगृहात प्रवेश मिळण्यासाठी विद्यार्थ्यांकडून ७७,८३९ अर्ज प्राप्त झाले आहेत.

(२) आदिवासी विकास विभागांतर्गत मंजूर एकूण ४९१ वसतीगृहांसाठी मंजूर प्रवेश क्षमता एकूण ५८,४६० इतकी असुन इमारत क्षमता ५६,३८४ इतकी आहे. त्यापैकी ५५,९९८ विद्यार्थ्यांना प्रकल्पस्तरावर प्रवेश देण्यात आला आहे व सुमारे २१,८४१ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळालेला नाही.

प्रकल्पस्तरावर ज्या वसतीगृहासाठी इमारत क्षमतेनुसार अर्ज प्राप्त झाले नाहीत व जागा रिक्त आहेत अशा वसतीगृहातील शिल्लक प्रवेश क्षमता आवश्यकतेनुसार जास्त प्रमाणात अर्ज प्राप्त झाले आहेत अशी वसतीगृहासाठी तात्पुरत्या स्वरुपात वर्ग करुन त्यानुसार प्रवेश देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा येथील जी.एन.एम. अभ्यासक्रमातील शिष्यवृत्तीधारकांना गत तीन वर्षाची शिष्यवृत्तीची रक्कम दिली नसल्याबाबत

**(३९) * ३८५७१ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एन.बी.छाबडा ट्रेनिंग कॉलेज ऑफ नर्सिग कोर्स सातारा येथील जी.एन.एम. अभ्यासक्रमातील विमुक्त जाती भटक्या जमाती, इमाव व विमाप्र शिष्यवृत्तीधारकांना गत तीन वर्षाची शिष्यवृत्तीची रक्कम ५७,७०,००० रुपये माहे ऑक्टोबर, २०१५ अखेर दिली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर ट्रेनिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांना द्यावयाची शिष्यवृत्तीची रक्कम तातडीने देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठीच्या सद्या सुरु असलेल्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेत जी.एन.एम. सह इतर काही अभ्यासक्रमांचा समावेश नाही. त्यामुळे सदर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमासाठीच्या शिष्यवृत्तीचा लाभ दिला जात नाही.

(३) विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग विद्यार्थ्यांसाठीच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेत नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील सावली येथे सामाजिक न्याय विभागाच्या वतीने मागासवर्गीय मुला - मुलींचे दोन स्वतंत्र शासकीय वसतिगृहाचे बांधकाम करण्याबाबत

**(४०) * ३५१५३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तालुक्याची निर्मिती होऊन २३ वर्षे झाल्यानंतर सुद्धा तालुक्याच्या ठिकाणी कुठेही मागासवर्गीय मुला-मुलीकरिता स्वतंत्र वसतिगृह नसल्यामुळे तालुका मुख्यालय असलेल्या सावली येथे सामाजिक न्याय विभागाच्या वतीने मागासवर्गीय मुलांचे आणि मुलींचे अशी दोन स्वतंत्र शासकीय वसतिगृहे मंजूर करून वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठीचे लेखी निवेदन माहे जानेवारी २०१५, मार्च २०१५, एप्रिल २०१५, जुलै २०१५, ऑगस्ट २०१५, सप्टेंबर २०१५, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री, प्रधान सचिव सामाजिक न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांना दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसतिगृह मंजूर करून वसतिगृह इमारतीचे बांधकाम करण्यासाठी निधीसह प्रशासकीय मान्यता देण्याबाबत अर्थसंकल्प अधिवेशन मार्च, २०१५ च्या अधिवेशनामध्ये कपात सूचनेच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तालुका मुख्यालय असलेल्या सावली येथे सामाजिक न्याय विभागाच्या वतीने मागासवर्गीय मुलांचे आणि मुलींचे दोन स्वतंत्र शासकीय वसतिगृह मंजूर करून वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

चंद्रपुर जिल्हयातील सावली येथे सामाजिक न्याय विभागाच्या वतीने मागासवर्गीय मुलांची व मुलींची दोन स्वतंत्र वसतिगृहे मंजूर करणेबाबत निवेदने शासनास प्राप्त झालेली आहेत.

(२) होय.

(३) सावली येथे सामाजिक न्याय विभागाचे वतीने मागासवर्गीय मुलांची आणि मुलींची दोन स्वतंत्र शासकीय वसतिगृहे मंजूर करणेची आवश्यकता तपासून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉकर्याड रोड रेल्वे स्टेशन लगत असलेल्या राज्य सरकारच्या मुंबई खादी ग्रामोद्योग विभागाच्या मालकीच्या जागेवर झालेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेबाबत

**(४१) * ३३६८१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई हार्बर लाईन वरील डॉकयार्ड रोड रेल्वे स्टेशन लगत असलेल्या राज्य सरकारच्या मुंबई खादी ग्रामोद्योग विभागाच्या मालकीच्या सीएस क्र. ३८/४२ ग्रामोद्योग वाडीमध्ये झालेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करून, सदरहू मालमत्ता सरकार जमा करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री व मा. उद्योग मंत्री, यांना दिनांक ३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मालमत्तेत झालेले अनधिकृत बांधकाम आणि अतिक्रमणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार अनधिकृत बांधकामावर कारवाई करून सदरहू जागा शासन जमा करण्याच्या दृष्टीने अद्याप शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) अद्याप, शासनाने याबाबत कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील डॉकयार्ड रोड स्टेशनलगत असलेल्या राज्य सरकारच्या खादी ग्रामोद्योग या मालमत्तेत झालेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करुन, सदरहू मालमत्ता सरकार जमा करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ०३.१०.२०१५ रोजीच्या निवेदनाद्वारे केली हे खरे आहे.
(२) व (३) सदर अनधिकृत बांधकामावर बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १७.११.२०१५ रोजी भायखळा पोलीस ठाणे यांच्या मदतीने महाराष्ट्र नगररचना अधिनियम कलम ५५ अन्वये कारवाई करुन अनधिकृत बांधकाम निष्कासित केले आहे.

संबंधित जागेची मालकी तपासून जागा शासन जमा करण्याची कार्यवाही महसूल विभागामार्फत करण्यात येईल.

-----------------

### गोंदिया डिस्ट्रीक्ट सेंट्रल को.ऑ.बँक, गोंदियाच्या भूखंड खरेदी व इमारत बांधकामामध्ये झालेली अनियमितता

**(४२) * ३६४५४ श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, गोंदिया यांच्या दिनांक ३ मार्च, २०१५ च्या चौकशी अहवालानुसार गोंदिया डिस्ट्रीक्ट सेंट्रल को.ऑ.बँक, गोंदियाच्या भूखंड खरेदी इमारत निर्माण मध्ये अपहार झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोंदिया डिस्ट्रीक्ट सेंट्रल को.ऑप. शाखा अर्जुनी/मोरगाव येथे रु.६,२३,५०,२२१/- चा गैरव्यवहार वार्षिक ताळेबंद पत्रकावरुन दिसत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली,
(४) नसल्यास, किती दिवसात कार्यवाही करणार ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) हे अंशतः खरे आहे.
अर्जुनी- मोरगाव शाखेमध्ये रु.७,७१,०५,९१९/- रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) अर्जुनी- मोरगाव शाखेतील शाखा व्यवस्थापक, सहलेखापाल, रोखपाल यांनी रु.१,९४,००,०००/- चा गैरव्यवहार केल्याबाबत दि.२२/०२/२०१२ रोजी अर्जुनी मोरगाव पोलीस स्टेशनमध्ये तक्रार [FIR] नोंदविली आहे. बँकेने तीनही आरोपींना निलंबीत केले आहे. पोलीस विभागाने आरोपींना अटक केली होती व त्यांचेविरुध्द न्यायालयात आरोपपत्र दाखल केले आहे. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांनी दि.२३/०३/२०१२ रोजी अर्जुनी मोरगांव शाखेच्या फेरलेखापरीक्षणाचे आदेश दिले आहेत. सन २००६ ते २००८ या कालावधीचे फेरलेखापरीक्षण पुर्ण झाले आहे. सन २००८ ते २०११ या कालावधीचे फेरलेखापरीक्षणाचे काम सुरु आहे.

(४) उचित कार्यवाही करण्यात आली असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयातील आश्रमशाळांमधील दुरावस्थेबाबत

**(४३) * ३८३३१ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयात आदिवासी विभागामार्फत जवळपास ९३ आश्रमशाळा चालविल्या जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आश्रमशाळांमध्ये मागील २० वर्षांपासून इमारतींची दुरुस्ती करण्यात आलेली नाही तसेच तुटलेले बेड, निकृष्ट दर्जाचे जेवण, अस्वछता, पावसाळ्यात छतामधून पाणी गळणे इत्यादी समस्यांना विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मागील ५ वर्षांपासून या आश्रमशाळांमधील ३३ विद्यार्थी मलेरिया, डायरिया, डेंगू, सर्पदंश आदि कारणांमुळे मृत पावले असून विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आश्रम शाळेतील विद्यार्थी मृत्युमुखी पडल्यास त्यांच्या नातेवाईकांना ७५ हजार रुपये सानुग्रह अनुदान म्हणून आदिवासी विभागामार्फत दिले जाते व विद्यार्थी अनुदानित संस्थेतील असल्यास हि जबाबदारी संस्था प्रमुखाची असूनही सदर अनुदान पालकांना मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) गडचिरोली जिल्हात ४३ शासकिय व ४९ अनुदानीत अशा एकुण ९२ आश्रम शाळा कार्यरत आहेत.

(२) हे, खरे नाही.

गडचिरोली जिल्ह्यातील शासकिय आश्रम शाळांमध्ये इमारतींची किरकोळ दुरुस्ती आवश्यकतेनुसार प्रत्येक वर्षी करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. त्याच प्रमाणे शालेय परीसरात, वर्ग खोल्या, मुला/मुलींचे वसतीगृह, शौचालये व स्नानगृहे यांमध्ये स्वच्छता ठेवण्यात येते.

(३) सन २०१२-२०१५ ते सन २०१५-१६ या कालावधीत गडचिरोली जिल्ह्यात शासकिय आश्रमशाळांतील ४१२४ तर अनुदानित आश्रमशाळातील एकूण ६५ विद्यार्थ्यांचा मुत्य झालेला आहे. आदिवासी विकास विभागाअंतर्गत फिरत्या आरोग्य पथकामार्फत सर्व शासकिय व अनुदानित आश्रम शाळांतील विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात येते. तसेच अनेक आश्रम शाळांत मलेरिया व डासांपासुन संरक्षणाकरीता खिडक्यांना जाळ्या बसविण्यात आलेल्या आहेत. सर्प व वन्य प्राणी यांच्यापासुन संरक्षणाकरीता शाळे भोवती सरंक्षक भिंती बांधण्यात आलेल्या आहेत.

(४) अनुदानीत आश्रम शाळेत मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकास संस्थेने सानुग्रह अनुदान अदा केलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील साखर कारखान्यांना कर्जे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४४) * २९५४० डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊस उत्पादकांची एफआरपीची रक्कम देण्यासाठी केंद्र शासनाने जाहीर केलेले कर्ज देण्यास राष्ट्रीयकृत बँकानी नकार दर्शविल्यामुळे ऊसाची थकीत बिले मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालक मंडळाने व्यक्तीगत थक हमी दिल्याशिवाय कर्ज देणार नाही अशी बँक व्यवस्थापनाची भूमिका आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राष्ट्रीयकृत बँकाच्या भूमिकेनुसार निर्णय घेवून साखर कारखान्यांना कर्जे उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही हे खरे नाही.

केंद्र शासनाने जाहीर केलेल्या योजनेनुसार शेतकऱ्यांनी एफआरपीची रक्कम अदा करण्यासाठी राज्यातील १२३ साखर कारखान्यांना रु. १५७२.०४ कोटी इतके अर्ज मंजूर झाले असून, त्यापैकी रु. १५६१.०२ कोटी इतक्या रकमेचे वितरण झाले आहे. तसेच राज्य शासन जाहीर सॉफ्ट लोन योजनेनुसार राज्यातील ७ साखर कारखान्यांना रु. ७२.३८ कोटी इतके कर्ज मंजूर झाले असून, त्यापैकी रु. ६७.३८ कोटी रकमेचे वितरण झाले आहे.

अशा प्रकारे राज्यातील एकूण १३० साखर कारखान्यांना रु. १,६४४.४२ कोटी इतके कर्ज मंजूर झाले असून, त्यापैकी रु. १६२८.४० कोटी इतक्या रकमेचे वितरण होऊन सदरची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झालेली आहे.
(२) व (३) केंद्र शासन अधिसूचना दि. २३/०६/२०१५ नुसार संबंधीत बँकांनी आवश्यकतेनुसार साखर कारखान्याची सार्वजनिक मालमत्ता तसेच संचालकांची वैयक्तिक मालमत्ता तारण ठेवून कर्ज मंजूर करावे अशी तरतूद आहे. तसेच शासन निर्णय दि. ३०/०७/२०१५ नुसार जे साखर कारखाने एन.पी.ए. मध्ये आहेत त्या कारखान्यांच्या कर्ज रकमेस संचालकांनी सामूहिक व वैयक्तिक हमी घेवून शासन थकहमी देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे-बेलापूर रोडवर तुर्भे जंक्शन जवळील रस्त्याची दुरावस्था झाल्याबाबत

**(४५) * ३०४३४ श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय

**सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-बेलापूर रोडवर तुर्भे जंक्शन जवळील रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून रस्त्यात मोठे मोठे खड्डे पडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावरुन दररोज जवळपास १ लाख वाहने ये-जा करत असल्याने खड्डयामुळे त्यांना अतोनात हाल सहन करावा लागतो याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे व येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) ठाणे बेलापूर या रस्त्यावरील तुर्भे उड्डणपुलाजवळ पुणेकडे जाणाऱ्या मार्गीकेच्या ९०.०० मी. लांबीत व ठाणेकडे जाणाऱ्या मार्गीकेच्या १३५.०० मी. लांबीमध्ये काही ठिकाणी २०१५ च्या पावसाळ्यामध्ये खड्डे पडले होते. ते प्रकल्पाच्या उद्योजकामार्फत डांबराने भरुन रस्ता वाहतूकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दापचरी (ता. डहाणू) दुग्ध प्रकल्प बंद अवस्थेत असून दुरुस्तीची विविध कामे दाखवून केलेला गैरव्यवहार

**(४६) * ३८०३६ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू तालुक्यातील दापचरी (ता.डहाणू) दुग्ध प्रकल्प बंद अवस्थेत असताना देखील दुरुस्तीची विविध कामे दाखवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार करुन शासनाची फसवणूक केल्याबाबतचे निवेदने स्थानिक लोकप्रतिनिधी (डहाणू) यांनी मा. महसूल मंत्री यांना दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्यांना विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, मुंबई यांच्या दिनांक ३०.११.२०१५ च्या पत्रान्वये सदरचे निवेदन सा.बां. विभागाकडे प्राप्त झाले आहे.

(२) व (३) अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांना दिनांक ५.१२.२०१५ च्या शासन पत्रान्वये चौकशी करुन अहवाल सादर करण्याकरिता आदेशित करण्यात आले आहे. चौकशी अहवाल प्राप्त झालेवर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निकोप ते शेलू (ता.कर्जत, जि.रायगड) या रेल्वे स्टेशनला जोडणारा पूल बांधण्याबाबत

**(४७) * ३३५३९ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) निकोप ते शेलू (ता.कर्जत, जि.रायगड) या रेल्वे स्टेशनला जोडणारा पूल नसल्याने तेथील जनतेला रेल्वे क्रॉसींग करतांना अनेक वेळा अपघात होवून अनेक प्रवासांचे बळी जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूल उभारावा अशी मागणी गेले कित्येक वर्षांपासून तेथील जनता तसेच लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक वर्षे मागणी करुनही शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.
(३) व (४) प्रश्नांकित पुलाचे काम मंजूरी निकष व निधीच्या उपलब्धतेच्या अधिनतेने हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

-----------------

**औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील रस्त्याचे**
**काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(४८) * ३०२३१ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील बस स्थानक परिसरातील डांबरीकरण करण्यात आलेल्या रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्याने सर्व रस्ते उखडले गेल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार रस्त्याचे निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत तसेच रस्त्याचे चांगल्या दर्जाचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. रस्त्यावर तुरळक ठिकाणी पडलेले खड्डे भरुन सद्य:स्थितीत रस्ता वाहतूकीस सुस्थितीत आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जहिराबाद ते अहमदनगर या प्रस्तावित करण्यात आलेल्या राष्ट्रीय महामार्गात दुरुस्ती करणेबाबत

**(४९) * ३३००५ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र रस्ते विकास योजना सन २००१ ते २०२१ चा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजीच्या जा.क्र.एन.एच.२०१४/सीआर/एनएच१ या पत्रान्वये सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावातील जहिराबाद ते अहमदनगर या प्रस्तावित करण्यात आलेल्या राष्ट्रीय महामार्गात दुरुस्ती करुन जहिराबाद - बिदर - उदगीर - अहमदपूर - चाकूर - अंबेजोगाई - केज - माजंरसुंबा - पाटोदा - जामखेड - आष्टी - कडा - अहमदनगर असा मराठवाडयास जोडणारा राष्ट्रीस महामार्ग प्रस्तावित करण्याची मागणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे मा.सार्वजनिक बांधकाम (सा.उ.वगळून) महोदयांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने रस्ते विकास योजना २००१-२०२१ च्या प्रस्तावातील जाहिराबाद-अहमदनगर राष्ट्रीय महामार्गाच्या प्रस्तावात दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) राज्य शासनाच्या पत्र क्रमांक: एनएचपी २०१४/प्र.क्र.१८१/रा.म.१, दिनांक १७ जानेवारी, २०१५ अन्वये, "जाहिराबाद - बिदर-उद्गीर - अहमदपूर - अंबेजोगाई - केज - मांजरसुंभा -पाटोदा - जामखेड-मिरजगाव - श्रीगोंदा - काष्टी - इनामगाव - न्हावरा - शिक्रापूर - चाकण - वडगाव" असा एकूण ४०३ कि.मी. या मार्ग राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्रशासनास सादर करण्यात आला आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) केंद्रशासनाने राज्यातील काही रस्ते तत्वत: राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्याचा निर्णय दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये घेतला आहे.

सदर निर्णयानुसार जहिराबाद-बिदर-देगलूर तसेच अहमदपूर-चाकूर (बी.एस.एफ.) - अंबेजोगाई - केज - मांजरसुबा - पाटोदा - जामखेड ही लांबी राष्ट्रीय महामार्ग म्हणून तत्वत: घोषित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जालना येथील सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ अंतर्गत**
**कामात अनियमितता झाल्याबाबत**

**(५०) * ३४२१३ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग जालना-१ अंतर्गत सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.३ चे उपविभागीय अभियंता शेख सलीम व शाखा अभियंता भट्टड यांचे कामासंदर्भात दिनांक २६/८/२०१५ रोजी वा त्या सुमारास अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना निवेदन देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ जालना येथील भ्रष्टाचार, अपहार व कामातील अनियमिततेची चौकशी करून दोषी अधिका-यांवर कायदेशीर कारवाई करावी या विषयीचे निवेदन दिनांक ८/९/२०१५ रोजी वा त्या सुमारास मा.अतिरिक्त मुख्य सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांना देण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विविध शासकिय कार्यालय व निवासी इमारतीच्या दुरूस्तीच्या नावाखाली बोगस देयके रेकॉर्ड करून शासकिय निधीचा गैरव्यवहार केल्याचे या तक्रारी मध्ये नमुद आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली आहे व त्यात काय निष्पन्न झाले आहे,

(५) असल्यास, या प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) शासकीय निधीचा अपहार झाल्याचे तक्रारीमध्ये नमूद आहे.

(४) व (५) तक्रारीच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद व अधीक्षक अभियंता, दक्षता पथक मंडळ, मुंबई यांच्याकडून चौकशी करण्यात येत आहे.

-----------------

**कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीमधील मोक्याची जागा बिल्डरला देण्यात येत असल्याबाबत**

**(५१) * ३०८७५ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य मार्केट यार्डातील १५ हजार चौरस फुटांची ॲमेनिटी स्पेस म्हणून राखीव असलेली जागा बांधा वापरा हस्तांतरीत करा म्हणजेच बीओटी तत्त्वावर वाणिज्य वापरासाठी विकसीत करण्याचा मंजूर करण्यात आलेला ठराव रद्द केला असतानाही विद्यमान संचालकांनी पुन्हा एकदा बीओटीचा ठराव दिनांक १२ जून, २०१५ च्या सभेत मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीमधील मोक्याची जागा बिल्डरला देऊन यामध्ये कोटयवधीचा गैरव्यवहार होण्याची शक्यता असल्याचा आरोप माजी सभापती बंडार पाटील यांनी केला असून या संदर्भात त्यांनी सविस्तर लेखी तक्रार सहकार मंत्र्याकडे माहे ऑगस्टच्या पहिल्या पंधरवड्यात वा त्यासुमारास केली असून बाजार समितीचे संचालक मंडळही बरखास्त करण्याची मागणीही केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. आर्थिक अडचणीमुळे बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या दि. २८.५.२०१४ च्या सभेत १५००० चौ.मी. जागा पी.पी.पी. किंवा बी.ओ.टी. तत्वावर विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला. सदरच्या ठरावानुसार प्रस्ताव मान्यतेसाठी पणन संचालक, पुणे यांना पाठविण्यात आला.

पणन संचालक, पुणे यांनी अधिकची माहिती मागविली. त्यानुसार अधिकची माहिती सादर करण्याबाबतचा ठराव दि. १२.६.२०१५ च्या सभेत पारीत करण्यात आला. सद्यस्थितीत सदर प्रस्ताव पणन संचालक, पुणे यांचेकडे प्रलंबित आहे.
(२) तक्रार प्राप्त झाली आहे.
(३) व (४) होय. दि. २६.११.२०१५ रोजी उपनिबंधक, सहकारी संस्था, कल्याण चौकशी अहवाल प्राप्त झाला असून चौकशीत तक्रारीतील मुद्दे निरर्थक असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

-----------------

## अहमदनगर-कोल्हार रस्ता चौपदरीकरणाच्या कामात त्रुटी असतानाही टोल वसूलीची परवानगी दिल्याबाबत

**(५२) * ३११४५ श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर-कोल्हार रस्ता चौपदरीकरणाच्या कामासंदर्भात संबंधित ठेकेदाराने कामात अनेक त्रुटी ठेवलेल्या असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या रस्त्यावर टोल वसूलीची परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मात्र ही परवानगी नियमबाह्य असल्याचा निष्कर्ष काढून महालेखा परिक्षकांनी आपल्या अहवालात विभागावर गंभीर ताशेरे ओढले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याच्या कामात त्रुटी असतानाही टोल वसूलीची परवानगी का दिली गेली आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) कराननाम्यातील तरतूदी नुसार पथकर वसुलीची परवानगी दिली आहे.

(२) महोलखापरिक्षक, मुंबई यांनी सदर प्रकल्पाबाबत माहे जून २०१४ चे निरीक्षणात आक्षेप नोंदविलेले आहेत. त्यापैकी एक आक्षेप पथकर वसूलीचे संदर्भात आहे.

(३) महालेखापरिक्षकांचे आक्षेपांचे अनुषंगाने पूर्तता अहवाल सादर करण्यात आला आहे. त्यावर महालेखाकाराकाकडून प्राप्त होणा-या निर्देशास अनुसरून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उदगीर ते बिदर या आंतर राज्यमार्गाला जोडणाऱ्या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(५३) * ३१५०२ श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर ते बिदर या आंतर राज्यमार्गाला जोडणाऱ्या उदगीर, नळेगांव, आष्ठामोड या सुमारे ३५ कि.मी रस्त्याची दुरावस्था झालेली असून, साईड पट्टयाही खचलेल्या असल्याने सदरहू रस्त्यावरील खड्डयामुळे अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून या रस्त्यावरील दळणवळण करणाऱ्या वाहनचालकांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर रस्त्याचे मजबुतीकरण, खडीकरण, डांबरीकरण करण्यात यावे यासाठी येथील ग्रामस्थांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, पालकमंत्री यांच्याकडे मागील ३ वर्षापासून सातत्याने मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याच्या मजबुतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याचे काम आजमितीस हाती न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे आहे.

सदर रस्त्याचे रुंदीकरण व मजबूतीकरण करण्यासाठी केंद्रीय मार्ग निधी सन २०१५-१६ अंतर्गत केंद्र शासनाने तत्वत: मान्यता दिली असून अंतिम मंजूरी प्राप्त झाल्यानंतर रस्त्याचे रुंदीकरण व मजबूतीकरण करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अलिबाग व डोंबिवली विभागाद्वारे एयर वॉल्वचा पुरवठा करण्याच्या टेंडर प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५४) * ३३७९९ श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अलिबाग व डोंबिवली विभागाद्वारे सन २०१३-१४ मध्ये एयर वॉल्वचा पुरवठा करणे या कामाच्या टेंडर प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याने महामंडळाचे आर्थिक नुकसान झालेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मा. उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कुठलीही कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदरच्या निवेदनातील मुद्यांची तपासणी करण्यात आली असून निविदा प्रक्रिया नियमानुसार राबविण्यात आली, त्यामध्ये कोणताही गैरव्यवहार किंवा महामंडळाचे आर्थिक नुकसान झालेले नाही.

-----------------

## ए.एस.क्लब ते पैठण लिंक रोडला जोडणाऱ्या रस्त्याची झालेली दुरावस्था

**(५५) * ३८२७८ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद - नगर महामार्गावरील वाढती वाहतुक तसेच अपघातांची संख्या लक्षात घेता, कोट्यवधी रुपये खर्चुन ए.एस.क्लब ते पैठण लिंक रोडला जोडणारा साडेचार कि.मी.चा रस्ता तयार करण्यात आला आहे, मात्र सव्वा वर्षातच या रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे सदर रस्त्यावर अपघातांची संख्याही वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) यामुळे या रस्त्याचे काम केलेल्या संबंधित ठेकेदाराची चौकशी करुन या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे. तथापि, पावसाळ्यात काही ठिकाणी पडलेल्या खड्यांची दुरुस्ती कंत्राटदाराकडून दोष दायित्व तत्वावर करण्यात आली असून सद्यस्थितीत सदर रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत चालु आहे.

(२) नाही.

(३) रस्त्याचे काम एप्रिल २०१४ मध्ये पूर्ण झालेले असून कंत्राटदाराने दोष दायित्व कालावधीमध्ये आवश्यक दुरुस्ती केली आहे. सद्यस्थितीत रस्त्यावर सुरळीत वाहतूक सुरु आहे. निविदा शर्तीनुसार कंत्राटदाराने त्यांचे स्वखर्चाने दुरुस्तीचे काम केलेले असल्याने कंत्राटदारावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या नावावर पीक कर्जाची उचल करुन रकमेचा अपहार करण्यात आल्याबाबत

**(५६) * ३८७२८ श्री.सुरुपसिंग नाईक (नवापूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या नावावर पीक कर्जाची उचल करुन रकमेचा परस्पर अपहार केल्याचा आरोप आदिवासी विकास परिषदेच्या पुसद शाखेने उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा पुसदचे व्यवस्थापक आणि बँकेतील एका दलालाविरुध्द अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदयान्वये गुन्हा दाखल करुन अटक करावी अशी उक्त निवेदनात मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे ही खरे आहे.

(३) पोलिस स्टेशन, पुसद शहर यांचेमार्फत तपास सुरु आहे.

(४) सदर प्रकरणी पोलिस स्टेशन, पुसद शहर येथे अप. नं २७०/२०१५ भा.द.वि.स. कलम ४०६,४०८,४०९,४२०, ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. संशयित आरोपींपैकी २ आरोपींनी सेशन कोर्ट पुसद येथुन जामिन मिळविला असुन ३ आरोपी फरार आहेत. त्यांचा शोध घेण्याचे काम चालु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्हा परिषदेअंतर्गत वेगवेगळ्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनांना निधी मिळूनही योजना प्रलंबित असल्याबाबत**

**(५७) * ३४७०१ श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा परिषदेअंतर्गत वेगवेगळ्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना औद्योगिक विद्यावेतन, माध्यमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती, अस्पृश्यता निवारणार्थ प्रचार, सफाई उद्योगातील पालकांच्या मुलांना मॅट्रीकपूर्वक शिष्यवृत्ती यासारख्या योजनांचा निधी खर्च न केल्याने सुमारे पाच कोटी २५ लाखांचा निधी परत जाण्याच्या मार्गावर असल्याचे दिनांक १८ ऑगस्ट, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी खर्च न होण्याची कारणे काय आहेत व या प्रकरणी नांदेड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागातील अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन, माध्यमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती, अस्पृश्यता निवारणार्थ प्रचार, अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या मुलांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती या योजनांसाठी सन २०१५-१६ या वर्षासाठी रु. ५८.६६ लाख इतकी तरतुद करण्यात आली असून त्यापैकी रु. ५.४२ लाख इतकी रक्कम खर्च झाली आहे. उपरोक्त योजनांच्या प्राप्त अर्जानुसार उर्वरित खर्च करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विशेष पारधी योजनेंतर्गत बंद पडलेल्या योजना चालू ठेऊन त्यास निधी मिळणेबाबत

**(५८) * ३७९३३ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विशेष पारधी योजनेंतर्गत बंद पडलेल्या योजना चालू ठेऊन त्यास निधी मिळणेबाबत आदिवासी पारधी महासंघाने माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये मा. आदिवासी विकास मंत्री महोदय यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ०८.०८.२०१५ रोजी मा. आदिवासी विकास मंत्री महोदयांनी या योजनांसाठी व पारधी समाजाच्या विकासासाठी प्रतिवर्ष ५० कोटी निधी देण्याची घोषणाही केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामध्ये प्रामुख्याने ११०० घरकुल बांधणी व २२३ सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध करण्याच्या हेतूने प्रकल्प कार्यालय, सोलापूर यांनी सर्व कागदपत्रांसह शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हेहि खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) होय.
(३), (४) व (५) नाही. प्रकल्प कार्यालय, सोलापूर यांनी सोलापूर जिल्ह्यातील पारधी समाजासाठी पारधी समाजासाठी पारधी विकास कार्यक्रमातंर्गत ११०० घरकुले व २२३ सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच अन्य योजनांचा आराखडा अप्पर आयुक्त, ठाणे यांना सादर केला आहे. सदरचा प्रस्ताव शासनास सादर केला नाही.

तथापि आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी सन २०१५-१६ या चालू आर्थिक वर्षाकरीता अर्थसंकल्पीत रु. २४.०० कोटी इतक्या निधीच्या मर्यादेत राज्यस्तरावर पारधी विकास कार्यक्रमातर्गत लाभार्थ्यांना घरकुल, युवकांना विविध क्षेत्रात रोजगारार्थ कौशल्य विकास प्रशिक्षण तसेच व्यवसाय सुरु करण्यासाठी अर्थसहाय्य या योजनांना निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला असून, या प्रस्तावास निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील जंगल कामगार सहकारी संस्थेत झालेला गैरव्यवहार

**(५९) * ३७०८० श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील (ता.घाटंजी) जंगल कामगार सहकारी संस्थेत करोडो रुपयांचा गैरव्यवहार निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेवर प्रशासक नेमणे संदर्भातील मागणी करण्यात आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थेची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार सदर संस्थेवर प्रशासक नेमणेबाबत तसेच दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) चौकशी अहवालानुसार सदर संस्थेच्या प्लॉट खरेदी व्यवहारामध्ये अनियमितता झाल्याचे दिसून आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, तक्रारीचे अनुषंगाने चौकशी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७८ (अ) (एक) (दोन) अन्वये कार्यवाही करण्यात आली व संस्था समिती निष्कासीत करुन संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली होती. दि. १.१२.२०१५ रोजी कलम ८३ अन्वये चौकशीचे आदेश पारित करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अमरावती यांनी खरीप कर्ज वाटपाचे लक्षांक पूर्ण न केल्याबाबत

**(६०) * २८९१९ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील एकूण ४०,००० शेतकऱ्यांपैकी फक्त १२,२०६ शेतकऱ्यांना ३३.७९ कोटींचे कर्ज वाटप केल्याने उर्वरित २७७९४ शेतकऱ्यांना पिक कर्ज रूपांतरणाच्या लाभापासून वंचित ठेवण्यात आल्याबद्दल दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अमरावती यांनी खुलासा सादर करण्याबाबत बँकेस फर्माविले असूनही अद्यापि बँक प्रशासनाने याबाबत कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने आतापर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अमरावती यांच्या प्रशासनावर आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे,

सन २०१४-१५ मध्ये ५८,४८५ शेतक-यांना रक्कम रु.४३४.९४ कोटींचे पिक कर्ज वाटप करण्यात आले होते. दि. ३०.०६.२०१५ अखेरपर्यंत वसुली न भरणा-या १९,४२२ शेतक-यांच्या कर्जाचे बँकेने रुपांतर करुन १२,३७५ शेतक-यांना ३४.१४ कोटींचे कर्ज नव्याने वाटप केले आहे.

उर्वरीत ७,०४७ रुपांतर पात्र शेतकऱ्यांनी बँकेकडे कागदपत्रे सादर न केल्यामुळे किंवा कर्जाची मागणी न केल्यामुळे कर्ज वाटप करण्यात आलेले नाही, असा बँकेने दि. २३.१०.२०१५ रोजी खुलासा केला आहे.

(२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अमरावती यांना सन २०१५-१६ खरीप कर्जवाटपाच्या दिलेल्या लक्षांकानुसार ७० टक्के कर्ज वाटप पुर्ण केलेले आहे. तसेच शासनाच्या निर्देशाप्रमाणे रु. १४०.०० कोटींचे रुपांतर केलेले आहे. तथापि सर्व शेतक-यांनी कर्जाची मागणी केलेली नसल्यामुळे सर्व सभासदांना रुपांतरीत कर्ज वाटप करण्यात आलेले नाही. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील आश्रम शाळेतील समस्यांबाबत**

**(६१) * ३४३०४ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील त्र्यंबकेश्वर येथील आश्रम शाळेतील ७५ आदिवासी मुलींनी आश्रम शाळेतील विविध समस्येसंदर्भात दिनांक २१ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास आदिवासी आयुक्त कार्यालयात ठिय्या आंदोलन करून आयुक्त कार्यालयात अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्याकडे विविध मागण्या केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भेटी दरम्यान आश्रम शाळेतील मुलींनी कोणकोणत्या मागण्या केल्या आहेत व सदर मागण्यासंदर्भात पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) त्र्यंबकेश्वर जि.नाशिक येथे आश्रमशाळा नसुन आदिवासी मुलींचे ७५ क्षमतेचे शासकीय वसतिगृह कार्यान्वीत आहे.

सदर वसतीगृहातील विद्यार्थीनींनी विविध समस्यांसंदर्भात दि. २१ सप्टेंबर, २०१५६ आयुक्त कार्यालयात ठिय्या आंदोलन करुन अधिकाऱ्यांची भेट घेऊन विविध मागण्या केल्याची बाब खरी आहे.

(२) सदर वसतीगृहातील विद्यार्थीनींनी वसतीगृह इमारत बदलणे, पिण्याचे पाणी, वॉटर हिटर किंवा सोलर यंत्र बसविणे, ॲक्वागार्ड/वॉटर कुलर, भोजन व्यवस्था,बेडींग साहित्य, लॉकर किंवा कपाटे, टी.व्ही., संगणक, स्टीडी रुम, ग्रंथालय, क्रीडा साहित्य, जनरेटर, मुलींना प्रसाधनभत्ता, स्टेशनरी, वह्या-पुस्तके इत्यादी विविध मुलभुत सोयी सुविधा संबंधी मागण्या केल्या होत्या.

उपरोक्त मागण्यांपैकी इमारत बदलणे, पाणी पुरवठा, भोजनव्यवस्था, क्रिडा साहित्य, जनरेटर, मुलींना प्रसाधनभत्ता, ड्रेसकोड, शैक्षणिक सहल, वह्या पुस्तके, इत्यादी साहित्य प्रकल्प अधिकारी, नाशिक व संबंधित गृहपाल यांचे स्तरावर पुर्तता करण्यात आली आहे.

उर्वरित मागण्यांची पूर्तता अपर आयुक्त, नाशिक यांच्याकडून पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्हयातील मनोर-भिवंडी महामार्गासाठी संपादीत केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात झालेल्या अपहाराबाबत**

**(६२) * ३५५१९ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील भिवंडी-मनोर या महामार्गासाठी संपादीत केलेल्या २२ शेतकऱ्यांच्या जमिनीच्या मोबदल्यापैकी त्यांना देण्यात आलेले १.३१ कोटी रूपये प्रत्यक्षात न देता या रकमेचा अपहार करण्यात आल्याची बाब माहे जुलै, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याच्या कामाचा ठेका सुप्रिम कंपनीस देण्यात आलेला होता व त्यांनी रस्त्याच्या बांधकामाचा उपठेका स्थानिक ठेकेदारांना दिला होता.त्यात वाड्यातील २२ शेतकऱ्यांना जमिनीचे चेक न मिळाल्यामुळे त्यांच्या नावे देण्यात आलेले धनादेश परस्पर वटविण्यात आल्याचे उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले व या प्रकरणी गैरव्यवहार करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

प्रकल्पाच्या रुंदीकरणासाठी लागणाऱ्या संपादीत केलेल्या जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी २२ बाधित शेतकऱ्यांना शासनातर्फे एकूण रुपये ३५ लाख ०८ हजार २७ अदा केलेले आहेत.

तथापि उद्योजकाने नेमणूक केलेल्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी पुन्हा सदर शेतकऱ्यांच्या नावाने दुसऱ्यांदा जुनी कागदपत्रे तयार करुन नवीन प्रस्ताव बनवून कंपनीला सदरचे पैसे देय असल्याबाबतची दिशाभूल करून एकूण रुपये १ कोटी ३१ लाख ८५ हजार २५९ इतक्या रकमेची कंपनीची आर्थिक फसवणूक केली आहे.

वस्तुत: सदर शेतकऱ्यांना शासनातर्फे आधीच मोबदला अदा करण्यात आला आहे. सदर बाबतीत कंपनीनी संबिंधत कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल केला आहे.
(३) सदर प्रकरणांची पोलिसांकडून चौकशी सुरु असून आरोपीवर कायदेशीर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## पांढुर्णा (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेच्या बांधकामावर असलेल्या चौकीदाराने केलेल्या अत्याचाराबाबत

**(६३) * ३४९१२ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढुर्णा (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील शासकीय आदिवासी आश्रम शाळेच्या बांधकामावर असलेल्या चौकीदाराने किमान सात मुलींवर लैगिंक अत्याचार केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आदिवासी आश्रमशाळेचे वसतीगृह व शाळा एकाच आवारात आहेत, शाळेचे शिक्षक मुख्यालयी राहत नाहीत तेही दिवसभर आश्रमशाळेत दिसत नाहित तसेच हा परिसर जंगल भागात असल्याने नीरव शांतता असते याचाच फायदा घेत राजू लांडगे या आरोपी चौकीदाराने चॉकलेटचे व मोबाईल मधील अश्लील छायाचित्रे दाखवून अनेक मुलींवर लैगिंक अत्याचार केला असून ही बाब आश्रमशाळा प्रशासनाला माहिती असूनही त्यांनी ही गोष्ट दडवून ठेवली हे लक्षात घेता शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे अंशत: खरे आहे.

दोन मुलींवर लैंगिक अत्याचार झालेला आहे.

(२) शाळेचे शिक्षक मुख्यालयी राहतात. सदर प्रकरणाच्या अनुषंगाने सदर बाब शासनाच्या निदर्शनास न आणल्याने अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांनी सदर शाळेचे मुख्याध्यापक अधिक्षक व अधिक्षिका यांना निलंबित केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खेड शिवापूर (जि.पुणे) टोलनाक्यावर शहर हद्दीत वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांना संपूर्ण मार्गाचा टोल भरावा लागत असल्याबाबत

**(६४) * ३५७६० श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर हद्दीपासून १० ते १५ किमी अंतरावर असलेल्या खेड शिवापूर टोलनाक्यावर शहर हद्दीत वास्तव्यास असणाऱ्या एम एच १२ क्रमांकाच्या वाहनांना संपूर्ण मार्गाचा टोल भरावा लागत असल्याचे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या टोलनाका परिसर हद्दीत वास्तव्यास असलेल्या नागरिकांना शेतीसाठी, लग्न समारंभासाठी, धार्मिक कार्यक्रम, देवदर्शनासाठी सतत ये-जा करावी लागते अशा प्रकारे या भागातील एम एच १२ क्रमांकाच्या वाहनधारकांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एम एच १२ क्रमांकाच्या वाहनांना टोल मधून वगळण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही. पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या मार्फत सुरु आहे. सदर रस्त्यावरील खेड शिवापूर टोलनाका पुणे शहरापासून २५.४० कि.मी. आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण आणि कामाचे सवलतकार मे. पी.एस. टोल रोड कंपनी प्रायव्हेट लिमिटेड यांच्यामध्ये झालेल्या सवलतकरारनाम्यातील तरतुदीनुसार टोलनाक्यापासून २० कि.मी. त्रिज्येच्या अंतरात राहणाऱ्या स्थानिक नागरीकांच्या बिगर व्यावसायिक वाहनांना पासेस देण्यात आल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

-----------------

## दिंडोरी (जि.नाशिक) येथील शासकीय वसतीगृहातील विद्यार्थीनीना निकृष्ट अन्नामुळे झालेली विषबाधा

**(६५) * ३८१३७ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील दिंडोरी येथे मुलींच्या शासकीय वसतीगृहात निकृष्ट अन्न देण्यात आल्यामुळे ३१ मुलींना विषबाधा झाल्याने संबंधीत मुलींनी पोलिसात तक्रार दाखल केली असून संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्याची मागणी केली असल्याचे तसेच शासनाच्या दुर्लक्षामुळे आदिवासी भागातील इगतपुरी, पेठ, हरसुल, सुरगणा येथील विविध आश्रमशाळा, आदिवासी वसतिगृहामधील विद्यार्थ्यांचे आरोग्य ढासळले असून यामध्ये एकाचा मृत्यू झाला आहे तर महिनाभरात २५० विद्यार्थ्यांवर उपचार करण्यात आले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी करुन संबंधित ठेकेदारावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे तसेच येथील विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबिरे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अंशत: खरे आहे.

आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, दिंडोरी, जुने व नवीन येथील ९ विद्यार्थीनीना दिनांक २५.९.२०१५ रोजी उलटया व जुलाबाचा त्रास झाल्याने जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे औषधेपचारासाठी दाखल करण्यात आले होते ही बाब खरी आहे. त्याचप्रमाणे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दरम्यान २५० विद्यार्थ्यांना औषधोपचारासाठी केल्याचा प्रकार नाशिक प्रकल्पात घडलेला नाही तसेच शासकीय आश्रमशाळेत विषबाधेचा प्रकार झालेला नसुन औषधोपचारा अभावी एका विद्यार्थ्याचा मृत्यू झालेला नाही.
(२) विद्यार्थीनीनी मागणी केल्याप्रमाणे उपरोक्त दोन्ही वसतीगृहातील ठेकेदारांचा भोजनेठेका बंद करण्यात आला असून नवीन भोजनठेका सुरु करण्यात आला आहे.

विद्यार्थीनींच्या आरोग्य तपासणीसाठी फिरती वैद्यकीय पथके नेमलेली असून त्यांच्यामार्फत नियमितपणे विद्यार्थ्यीनींची आरोग्य तपासणी करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्रातील ३८४९ कि.मी. लांबीच्या राज्य महामार्गांचे राष्ट्रीय महामार्गात रुपांतर करण्याबाबत

**(६६) * ३८८०४ श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील ३८४९ कि.मी. लांबीच्या राज्य महामार्गाचे राष्ट्रीय महामार्गात रुपांतर करण्याचा महत्वपूर्ण निर्णय माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घेण्यात आला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य महामार्ग राष्ट्रीय महामार्गात परिवर्तीत करण्यात आल्यानंतर त्याच्या तातडीच्या देखभालीसाठी २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामार्गाच्या निकषानुसार या रस्त्यांचे रुंदीकरण करुन हे रस्ते सहा आणि आठ पदरी करण्यात येणार, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत राज्य शासनाने काही रोड मॅप तयार केला आहे काय,

(५) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, राज्यातील ३८४९.० कि.मी. लांबी ही राष्ट्रीय महामार्ग म्हणून तत्वतः घोषित करण्याचा निर्णय केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने घेतला आहे.

(२) सदर तत्वतः घोषित लांबी, राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित झाल्याची अधिसूचना अद्याप निर्गमित झालेली नाही. त्यामुळे सदर लांबी राष्ट्रीय महामार्ग म्हणून परावर्तीत होणे प्रलंबित आहे. तथापि यापुर्वी नविन घोषित झालेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या लांबीच्या तातडीच्या देखभालीसाठी नियतकालीक सुधारणा कार्यक्रम २०१५-१६ अंतर्गत, कैंद्र शासनाने रु. ९७.०० कोटी किंमतीचा (भाग-१) कार्यक्रम मंजूर केला आहे. कैंद्रशासनाकडे रु. १४७.७८ कोटी किंमतीची २२ अंदाजपत्रके मंजूरीसाठी सादर करण्यात आले असून, १५ अंदाजपत्रकांना (रु. ८४.६२ कोटी) मंजूरी प्राप्त असून उर्वरीत अंदाजपत्रके मान्यतेच्या अंतीम टप्प्यात आहेत.

(३), (४) व (५) तत्वतः घोषित ३८४९ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे रुंदीकरण करण्यासाठी सल्लागारामार्फत प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम (राष्ट्रीय महामार्ग) विभाग व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे मार्फत सल्लागार निश्चितीची निविदा विषयक कार्यवाही प्रगतीत आहे.

सदर लांबीतील प्रकल्प अहवाल तयार करुन प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी राज्यशासनाकडून राष्ट्रीय महामार्गाच्या कार्यान्वयासाठी जादा राष्ट्रीय महामार्ग कार्यालयांची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----------------

## आनंदनगर, एमआयडीसी (अंबरनाथ, जि.ठाणे) मधील कंपन्या नियमाचे पालन करत नसल्याबाबत

**(६७) * २८४०५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोणत्याही एमआयडीसी क्षेत्रात स्थानिकांना पर्यवेक्षकीय नोकऱ्यामध्ये ५० टक्के तर इतर नोकऱ्यामध्ये ८० टक्के नोकऱ्या देण्याचा शासनाचा नियम असताना, बहूतांशी कंपन्यामध्ये स्थानिकांना डावलण्यात येत असून, दुसऱ्या शहरात अथवा राज्यात मुलाखती घेऊन, त्यांची नियुक्ती आनंदनगर एमआयडीसी (अंबरनाथ, जि.ठाणे) मध्ये करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामगारांची माहिती स्थानिक पोलिसांना न दिल्यामुळे गुन्हेगारीत वाढ झालेली आहे व असे गैरप्रकार थांबविण्याबाबत व इतर अनेक बाबीच्या संदर्भात स्थानिक लोकांनी दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ पासून अतिरिक्त कार्यकारी अभियंता, आनंदनगर एमआयडीसी यांच्या कार्यालयाबाहेर आमरण उपोषण करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उपोषणकर्त्यांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहेत, त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक १७/११/२००८ अन्वये राज्यातील सर्व औद्योगिक घटकांमध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५० टक्के व इतर श्रेणीत किमान ८० टक्के स्थानिक उमेदवारांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार आनंदनगर एमआयडीसी क्षेत्रातील औद्योगिक घटकांमध्ये स्थानिक उमेदवारांचे प्रमाण राखले असल्याचे दिसून येते.

तथापि, रोजगारासाठीच्या मुलाखती बाहेरगावी न घेता औद्योगिक क्षेत्रामध्येच घेण्याविषयी महामंडळाच्या स्थानिक कार्यालयामार्फत ॲडिशनल अंबरनाथ मॅन्युफॅक्चरींग असो. यांना दि. २४/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(२) व (३) स्थानिक लोकांनी दि. २५ ऑगस्ट, २०१५ पासून उपोषण केले हे खरे आहे. तथापि, अति. अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रामध्ये गुन्हेगारीत वाढ झाल्याचे दिसून येत नाही, असे पोलीस आयुक्त, ठाणे यांच्या कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे. तरीही उद्योजकांनी कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची पुर्व चारित्र्य पडताळणी केल्याशिवाय त्यांना कामावर घेऊ नये असे निर्देश ॲडिशनल अंबरनाथ मॅन्युफॅक्चरींग असो. यांना संबंधित पोलीस ठाण्याकडून देण्यात आलेले आहेत.

(४) उपोषणकर्त्यांच्या मागण्यांचे स्वरुप पुढील प्रमाणे आहे :-

१) महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार स्थानिकांना रोजगारात (पर्यवेंक्षकीय श्रेणीत ५० टक्के व इतर ८० टक्के) असणाऱ्या प्राधान्याच्या नियमाचे उल्लंघन.

२) अंबरनाथ एमआयडीसीमधील रोजगारासाठी होणाऱ्या मुलाखती वेगळ्या शहरात घेणे.

३) पर राज्यातुन आलेल्या कामगारांची माहिती शासनास न पुरविल्यामुळे गुन्हेगारीत होणारी वाढ याबाबत पुढील कार्यवाही केली आहे :-

१) महामंडळातर्फे उद्योजकांना भूखंड वाटप करण्यासाठीच्या करारनाम्यात स्थानिकांना गुणवत्तेच्या आधारावर प्राधान्याने रोजगारात सामावून घेण्याची अट नमूद करण्यात येते.

२) रोजगारासाठी मुलाखती बाहेरगावी न घेता स्थानिक कार्यालयातर्फे घेण्याचे संबंधितांना दि. २४/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

३) उद्योजकांनी कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची पुर्व चारित्र्य पडताळणी केल्याशिवाय त्यांना कामावर घेऊ नये असे निर्देश ॲडिशनल अंबरनाथ मॅन्युफॅक्चरींग असो. यांना संबंधित पोलीस ठाण्याकडून देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग येथील श्रीबाग मध्यवर्ती संस्था मर्यादित संस्थेने वेशवी येथील फ्लोअर मिल व संस्थेची जागा सहकार खात्याच्या परवानगी शिवाय विकल्याबाबत

**(६८) * ३६६२६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीबाग मध्यवर्ती संस्था मर्यादित (ता.अलिबाग, जि.रायगड) या संस्थेने मौजे वेशवी येथील फ्लोअर मिल व संस्थेची जागा सहकार खात्याच्या परवानगी शिवाय विकल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतीनिधिनी माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास मा.सहकार मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या कर्ज फेडी सापेक्ष उक्त संस्थेने सहकार खात्याची परवानगी न घेता जागा विकली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी झालेल्या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

असे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि सदर जागेची विक्री सहकार खात्याच्या पणन संचालनालयाच्या परवानगीने संस्थेने केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## समाजकार्य महाविद्यालय कामठी (जि. नागपूर) या विना परवानगीने सुरु असलेल्या महाविद्यालयास शासनाचे अनुदान मिळत असल्याबाबत

**(६९) * ३५५८४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजकार्य महाविद्यालय कामठी (जि. नागपूर) या महाविद्यालयाने

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्याकडे विद्यापीठ कायद्यांतर्गत नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अर्ज केले नसतानाही तसेच कोणतेही कागदपत्र विद्यापिठाकडे उपलब्ध नसताना सुद्धा गेल्या पाच वर्षापासून विनापरवानगीने सदर महाविद्यालय सुरु असल्याची माहिती दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाची किंवा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ या विद्यापीठाची मान्यता नसतांनाही समाजकार्य महाविद्यालय कामठी (जि. नागपूर) या महाविद्यालयास शासनाकडून अनुदान मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महाविद्यालयाबाबत पुराव्यानिशी लेखी तक्रार सन २०१५ मध्ये आयुक्त, समाज कल्याण, पुणे आणि सन २०११ पासून समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांच्याकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चैाकशी केली आहे काय, चौकशी अंती शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) नाही, तथापि, सदर महाविद्यालयास शासनाच्या दि. २०/०९/१९९४ च्या पत्रान्वये सन १९९४-९५ पासून बी.एस.डब्ल्यू./ एम.एस.डब्ल्यू. हा अभ्यासक्रम सुरु करण्यात विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देण्यात आली. त्यानंतर शासनाच्या दि. २१/११/२००८ च्या शासन निर्णयानुसार १००% अनुदानास मान्यता देण्यात आली आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे. तथापि, समाजकार्य महाविद्यालयाच्या तक्रारीची प्रत आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचेकडे प्राप्त झाली नसून ती सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, नागपूर यांचेकडे प्राप्त झाली होती.

(४) व (५) नागपूर विद्यापीठ अधिनियम १९७४ च्या कलम (४३) (सी) (II) मधिल तरतुदीनुसार नवीन महाविद्यालयाच्या प्रस्तावास शासनास परवानगी देण्याचा अधिकार आहे. त्यामुळे सदर महाविद्यालयाच्या मान्यतेच्या तक्रारीविषयी चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर-भंडारा-गोंदिया या भागातील सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(७०) * ३३६८२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-भंडारा-गोंदिया या भागातील सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सन २००८-१० या कालावधीतील रस्त्याच्या कामात १३५ कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी अधिक्षक अभियंता, भरारी दक्षता नियंत्रण पथक, मुंबई यांचेतर्फे चौकशी करण्यात येवून, याबाबतचा अहवाल सादर करूनही अद्याप यावर राज्य शासनाने दोषीं विरुध्द कोणतीच कारवाई केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ०७ सप्टेंबर, २०१५ रोजी मा. मंत्री महोदयांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनातील अनुषंगाने शासनाने यावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे व किती निश्चित कालावधीत शासनाकडून यावर कार्यवाही पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, उक्त चौकशी अहवालातील मुद्यानुसार, अद्याप शासनाने दोषींविरुध्द कारवाई न करण्याची व विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अधीक्षक अभियंता, दक्षता पथकमंडळ, मुंबई यांचेकडून नुकताच दि. १/१२/२०१५ रोजीच्या पत्रान्वये अहवाल प्राप्त झाला आहे.

(२) होय.

(३) व (४) सद्य:स्थितीत, अधीक्षक अभियंता, दक्षता पथक मंडळ, मुंबई यांचेकडून प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने छाननी सुरु आहे.

-----------------

## कर्जत तालुक्यातील पोशीर येथील आदिवासी भागात रस्ता होण्याबाबत

**(७१) * ३३५४० श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे**

**(मुरबाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील पोशीर येथील देवपाडा, उंबरवाडी, गिऱ्हाचीवाडी, चिंचवाडी, वाघ्याचीवाडी या आदिवासी वाड्यातील विद्यार्थ्यांना शाळेत जाताना दररोज जंगलातून जीव धोक्यात घालून आठ कि.मी. पायपीठ करित शाळेत जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास गेली अनेक वर्ष वन विभागाच्या आढमुठ्या भुमिकेमुळे या रस्त्याचे काम रखडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच तेथील जनतेची रस्ता होण्याबाबत सतत मागणी करुन कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास या आदिवासी भागात रस्ता होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) सदरच्या रस्त्याचे बांधकाम मुळ स्वरुपाचे आहे. या रस्त्यासाठी लागणारा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उपलब्ध होणे आवश्यक आहे. तसा प्रस्ताव जिल्हा परिषदेमार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्नांकित रस्ता करण्यासाठी सन २०१६-१७ च्या आर्थिक संकल्पात समाविष्ठ करण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे तसेच रस्त्याचे बांधकामाकरीता प्रस्ताव मंजूर झाल्यास नमुद रस्त्याच्या लांबीमध्ये खाजगी मालकांच्या जमिनी येत असल्याने त्यांचे नाहरकत प्रमाणपत्र घेवून वन विभागाकडे प्रस्ताव जिल्हा परिषदेमार्फत सादर करण्यात येईल.

-----------------

## औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील सरस्वती आश्रमशाळेचे मुख्याध्यापक यांनी नियमबाहयपणे मुख्याध्यापक पदाची पदोन्नती घेतली असल्याबाबत

**(७२) * ३०२८४ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित**

**(इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील सरस्वती आश्रमशाळेचे मुख्याध्यापक यांनी नियमबाहय व बनावट बीएडच्या पदव्या सादर करुन व सेवा ज्येष्ठता डावलून मुख्याध्यापक पदाची पदोन्नती घेतली असल्याबाबत माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय.

(२) व (३) दोषी कर्मचाऱ्यावर पदावनतेची कार्यवाही करण्यात आली आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असून मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी जैसे थे असे आदेश पारित केल्याने कर्मचारी कर्तव्यावर हजर आहेत.

-----------------

**अनुसूचित जाती-जमातींच्या दाखल्यासाठी ठरविण्यात आलेला कार्यकाल बदलण्याबाबत**

**(७३) * ३८७६६ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती-जमातीतील गरजूंना शासकीय नोकरी वा शैक्षणिक कारणांसाठी जात दाखला मिळण्यासाठी सद्य:स्थितीत ठेवण्यात आलेला दिनांक १० ऑगस्ट, १९५० हा कार्यकाल रद्द करुन दिनांक १ मे, १९६० हा कार्यकाल ठेवण्याची मागणी अनुसूचित जाती-जमातीच्या विविध संघटनांनी शासनाकडे केली असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने अनुसूचित जाती-जमातींच्या दाखल्यासाठी ठरविण्यात आलेला कार्यकाल बदलण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे आहे.

(२) याबाबत भारताचे ॲटर्नी जनरल यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जालना शहरातील रस्त्यांच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(७४) * ३४२१७ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना शहरातील डांबरी रस्त्यांच्या कामात गैरव्यवहार झाला असुन सदरील कामे अत्यंत निकृष्ट झाल्याची तक्रार दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी यांना देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जालना शहरातील प्रमुख ८ डांबरी रस्त्यांच्या कामात कोट्यावधीचा गैरव्यवहार झाला असून गुणवत्ता व दक्षता मंडळाचे कोणतेही निकष पाळण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी अहवाल चुकीचा असुन अहवाल देणाऱ्या अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे असे या तक्रारीत नमुद केले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळले तसेच दोषी विरूध्द काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जालना शहरातील रस्त्यांच्या डांबरीकरणाचे व सिमेंट रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत आम आदमी पार्टी, जालना यांच्याकडून जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे दिनांक १५ ऑगस्ट, २०१५ रोजी तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) या प्रकरणी जिल्हाधिकारी, जालना यांना यापूर्वी प्राप्त झालेल्या नागरिकांच्या तक्रारी तसेच स्थानिक विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०१५ च्या पहिल्या अधिवेशनात उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने त्यांनी उपविभागीय अधिकारी, जालना यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त केली होती.

उपविभागीय अधिकारी, जालना यांनी जिल्हाधिकारी, जालना यांना सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार रस्त्यांच्या कामात कोणतीही अनियमितता नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे या प्रकरणी कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लिंगायत समाजास आरक्षण देण्याबाबत**

**(७५) * ३६३९४ श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यशासनाने दिनांक ४ सप्टेंबर, २०१४ रोजी लिंगायत समाजास आरक्षण देण्यासंबंधीचा शासन निर्णयाचा अध्यादेश काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अध्यादेशात हिंदू लिंगायत, वीरशैव लिंगायत, कानडी लिंगायत सारख्या पोट जातींचा आरक्षणाच्या यादीत समावेश केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील पोट जातींना ओ.बी.सी. प्रवर्गाचा लाभ मिळत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

दिनांक ०४/०९/२०१४ च्या शासन निर्णयाद्वारे राज्याच्या मागासवर्गीयांच्या यादीमध्ये इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गात लिंगायत समाजाच्या काही जातींचा समावेश करण्यांत आला आहे.

(२) नाही.

(३) महाराष्ट्र राज्याच्या मागासवर्गीयांच्या यादीमध्ये ज्या जातींचा समावेश आहे, केवळ त्याच जाती समाजाच्या लोकांना मागासवर्गीयांचे जात प्रमाणपत्र देण्यांत येत असल्यामुळे त्यांना त्या-त्या प्रवर्गाचे लाभ मिळतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील शासकीय दंत महाविद्यालयाची यंत्रसामुग्री जागा व दुरुस्तीअभावी पडून असल्याबाबत

**(७६) * ३८२८६ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील शासकीय दंत महाविद्यालयाची ५ कोटी रुपयांची यंत्रसामुग्री जागा व दुरुस्ती अभावी पडुन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुरुस्ती व बांधकामाबाबत प्रशासनातर्फे वारंवार पाठपुरावा करुनही सार्वजनिक बांधकाम विभाग त्याकडे टाळाटाळ करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे महाविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व उपचार घेणाऱ्या रुग्णांना सेवा देण्यास अडथळा येत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व पडून असलेल्या यंत्रसामुग्रीचा वापर करुन घेणार काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) नाही.
(३) नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व विनापरवाना गाळप करणाऱ्या साखर कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत

**(७७) * ३६६०३ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात चालू वर्षापासून साखर कारखान्यांना गाळप हंगाम सुरु करण्यासाठी परवाना घेणे बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उस उत्पादक शेतकऱ्यांना मागील हंगामातील एफआरपीची रक्कम ७५ टक्के देण्याची अट गाळप परवान्यासाठी घालण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ पासून राज्यातील २५ साखर कारखान्यांनी परवान्याशिवाय गाळप हंगाम सुरु केला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, विनापरवाना गाळप करणाऱ्या या साखर कारखान्यांवर शासन कोणती कारवाई करीत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) ऊस नियंत्रण आदेश १९६६ व महाराष्ट्र साखर कारखाने (गाळप व ऊस पुरवठा नियमन) आदेश १९८४ नुसार साखर कारखान्यांना दरवर्षी ऊस गाळप परवाना घेणे बंधनकारक आहे.
(२) दि. २४ सप्टेंबर, २०१५ च्या मा. मंत्री समितीच्या सभेत निश्चित केलेल्या धोरणानुसार ज्या कारखान्यांनी गाळप हंगाम २०१४-१५ मधील एफआरपी शेतकऱ्यांना देय असलेल्या रक्कमेच्या ७५ टक्के व त्यापेक्षा अधिक दिली असेल तरच गाळप हंगाम २०१५-१६ चा गाळप परवाना रककमे देण्यात येत आहे.
(३), (४) व (५) राज्यातील एका साखर कारखान्याने ७५ टक्के पेक्षा कमी एफआरपी दिलेली असून दि. २८/१०/२०१५ पासून विना परवाना गाळप सुरु केलेले आहे. शासन दि. १४/१०/२०१५ चे अधिसूचनेनुसार सदर कारखान्यांवर विनापरवाना गाळप केल्यामुळे दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

-----------------

## पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गावरील वेळू, शिंदेवाडी, ससेवाडी परिसरात पावसात दरड कोसळल्याबाबत

**(७८) * ३७९९८ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गावरील वेळू, शिंदेवाडी, ससेवाडी परिसरात दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास झालेल्या मुसळधार पावसात दरड कोसळून महामार्ग पाण्याखाली गेला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे वाहतूक सुमारे तीन ते चार तास ठप्प होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पावसाळयात नेहमीच या महामार्गावर दरड कोसळण्याचे प्रकार होतात हे प्रकार रोखण्याकरिता शासनाने कोणत्या विशेष उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही. पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ चे चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत सुरु आहे. सदर रस्त्याच्या कात्रज बोगद्याजवळ डोंगरावरुन घसरलेल्या दगड व मातींमुळे रस्त्याचा काही भाग क्षतिग्रस्त झाला होता. तथापि या ठिकाणी वाहतुक पुर्णतः बंद न होता अल्पकाळासाठी धिम्यागतीने सुरु होती असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.
(३) सदर रस्त्याचे निरिक्षण करुन रस्त्याच्या कडेच्या डोंगराचे कटींग करुन योग्य उतार देणे, बोगद्यावरील सैल झालेले खडक काढणे, पुल व मोऱ्यांचे वाहमार्ग साफ करणे इ. उपाय योजना करण्यात आल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### विदर्भातील ८० टक्के सहकारी संस्था बंद होत असल्याबाबत

**(७९) * ३६०२६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भात २६ हजार ८०० सहकारी संस्था असून या सहकारी संस्थेचे खेळते भागभांडवल १५ हजार ८७ कोटी असले तरी गेल्या काही वर्षापासून शासनाच्या उदासिनतेमूळे आजमितीस ८० टक्के सहकारी संस्था बंद झाल्याची माहिती दिनांक २९ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर सहकारी संस्था बंद पडू नये आणि बंद पडलेल्या सहकारी संस्था पुन्हा सुरू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे, नागपूर विभागात एकूण ८८९० सहकारी संस्था आहेत. त्यापैकी सर्वेक्षण मोहिम सुरु होण्यापूर्वी एकूण ३४८२ संस्था बंद होत्या. दिनांक १ जुलै, २०१५ ते ३० सप्टेंबर, २०१५ पर्यंत सर्वेक्षणाची विशेष मोहिम राबविण्यात आली. त्यामध्ये एकूण १६०८ संस्था बंद/कार्यस्थगित/ठावठिकाणा नसलेल्या आढळून आल्या आहे. त्यापैकी १४० संस्था कार्यरत होवू शकत असल्यामुळे उर्वरित १४६८ संस्थाविरुध्द अवसायनाची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे सर्वेक्षण मोहिमेपुर्वी एकुण ३४८२ व सर्वेक्षण मोहिमेनंतर एकुण १४६८ अशा एकुण ४९५० संस्थाविरुध्द अवसायनाची कार्यवाही सुरु आहे.

अमरावती विभागात मार्च, २०१५ अखेर एकुण ८८०६ संस्था असून त्यांचे खेळते भांडवल ३६५७.८६ कोटी आहे माहे सप्टेंबर २०१५ चे सर्वेक्षण मोहिमेनुसार बंद संस्था, कार्यस्थगित व ठावठिकाणा नसलेल्या संस्थांची संख्या १९६४ आहे.

(२) होय, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे या कार्यालयाने दिनांक १७.२.२०१५ चे परिपत्रकान्वये सर्व संस्थांचे सर्वेक्षण केलेले आहे.

(३) सहकारी संस्थांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९अ अन्वये वेळोवेळी तपासणी घेणे व सदर तपासणीमध्ये आढळून आलेल्या दोषांची दुरुस्ती करुन घेणे, संस्थांचे लेखापरिक्षण नियमीतपणे पार पाडणे व त्यामध्ये आढळून आलेल्या दोषांची दुरुस्ती करुन घेणे, सहकारी संस्थांचे सभासद, पदाधिकारी, अधिकारी यांना प्रशिक्षण देवून संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये सुधारणा घडवून आणणे. या उपाययोजनामुळे सहकारी संस्था या चांगल्यापध्दतीने कार्यरत राहून त्या बंद होण्याचे प्रमाण कमी होणे अपेक्षित आहे.

बंद संस्थांबाबत अवसायकाने पदभार स्विकारल्यानंतर सदरच्या संस्थांचे पुर्नजिवन करण्यासाठी संस्थेच्या सर्वसाधारण सभेमध्ये घेतलेल्या निर्णयास अनुसरुन सदरच्या अवसायनात घेण्यात आलेल्या संस्थांचे पुर्नजिवन करता येणे शक्य आहे याची खात्री पटल्यावर असा प्रस्ताव अवसायकाने निबंधकाकडे पाठवुन संस्थेचे पुर्नजिवन करता येऊ शकते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण (बार्टी) या संस्थेत ११ महिन्यांच्या करारावर नियुक्त्या देऊन तीन-चार महिन्यातच बडतर्फ करण्यात आलेबाबत**

**(८०) * ३०३२४ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास, डॉ.क्षिप्रा उके, डॉ.शिवशंकर दास व जितेंद्र नायक या तीन व अन्य व्यक्तींनी सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारितील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण (बार्टी) या संस्थेत ११ महिन्यांच्या करारावर नियुक्त्या देऊन तीन-चार महिन्यातच बडतर्फ करण्यात येणे अशा प्रकारे नोकर भरतीत घोटाळा सुरु असल्याबाबतच्या तक्रारी, मा.राज्यपाल, मा.मुख्यमंत्री व सामाजिक न्याय मंत्री यांचेकडे केल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार याप्रकरणी पुढे काय कारवाई केली आहे,

(४ नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: होय, अशा स्वरुपाचे निवेदन संबंधितांनी दिनांक १६.१०.२०१५ रोजी सादर केले आहे.

(२) व (३) डॉ.क्षिप्रा उके, डॉ.शिवशंकर दास व जितेंद्र नायक यांची ३ महिन्यांच्या कालावधीसाठी दिनांक १२.६.२०१५ च्या आदेशान्वये महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण केंद्र पुणे (बार्टी) यांनी मानधनतत्वावर नियुक्ती केली होती. मानधन तत्वावरील नियुक्ती संपुष्टात आल्याने त्यांना कमी करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भुदरगड नागरी पतसंस्थेच्या ठेवीदारांना न्याय मिळण्याबाबत

**(८१) * ३८८०२ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००२ सालापासून आजपर्यंत भुदरगड नागरी पतसंस्थेत अडकून राहिलेल्या ठेवी परत न मिळाल्याने या पतसंस्थेचे हजारो ग्राहक आर्थिक गर्तेत सापडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पतसंस्थेवर शासनाने प्रशासक नेमल्यानंतर दहा हजार रुपयांच्या आतील रक्कम ग्राहकांना अदा करण्यात आली असून दहा हजार रुपयांच्यावरील रकमेबाबत शासनस्तरावर आजतागायत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पतसंस्थेच्या हजारो ग्राहकांच्या रकमा तातडीने अदा करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) सदर संस्थेस शासनाकडून मिळालेल्या रु. १५.५० कोटी अर्थसहाय्यातुन मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि. २२.०९.२०११ च्या आदेशानुसार रु. १०,०००/- पर्यतच्या ठेवी असणाऱ्या १६,६६२ ठेवीदारांना रु. ६.८० कोटी तसेच रु. २०,०००/- पर्यतच्या ठेवी असणाऱ्या २,७५३ ठेवीदारांना रु. २.८५ कोटी असे दि. ३१.१०.२०१५ अखेर रु. ९.६५ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे.

तसेच २०,००० रुपयावरील ठेवींदारांच्या ठेवी वाटप करण्यास परवानगी देण्याबाबत मा. उच्च न्यायालयास विनंती केली आहे.

(३) संस्थेवर ५ शासकीय अधिकाऱ्यांची अवसायक समिती नियुक्त असून अवसायक समिती मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार कामकाज पाहत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड एम.आय.डी.सी. औद्योगीक वसाहतीमध्ये उद्योगधंद्यासाठी दिलेल्या भूखंडाचा रहिवासी वापर केला जात असल्याबाबत

**(८२) * ३४२२० श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड एम.आय.डी.सी.मध्ये उद्योग धंद्यासाठी दिलेला भुखंड विकसीत करण्याऐवजी त्या भूखंडावर घर बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड एम.आय.डी.सी. बांधकाम विभागाने बांधलेला बायपास रोडचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याचे चौकशीत प्रथम दर्शनी आढळून आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, औद्योगीक वसाहती मध्ये अनेक अनियमितता असून अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने गैरव्यवहार झाल्याची तक्रार संबंधीत खात्याकडे करण्यात आली हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले, दोषींविरूध्द काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे अंशतः खरे आहे.

काही भूखंड धारकांनी रहिवासी वापर केला आहे. सदरचा रहिवासी वापर हा महामंडळाशी केलेल्या करारनाम्याचा भंग असून संबंधीतांवर कारवाई करण्यासाठी महामंडळाने संबंधीतांना नोटीस दिलेल्या आहेत.

(२) सदर रस्त्याचे बांधकाम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केलेले आहे, हे खरे नाही.

(३) व (४) या संदर्भात दि. १९/०८/२०१५ रोजी निनावी तक्रार प्राप्त झाली असून सदर तक्रारीमध्ये तथ्य आढळून आलेले नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.